
रविवार, ९ जानेवारी २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक १७३
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## वाढत्या कोरोना प्रादुर्भावामुळे राज्यात कठोर निर्बंध



**मुंबई :** कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शनिवारी (दि. ८) अखेर नवी नियमावली जारी करीत कठोर निर्बंध लागू केले आहेत. त्यानुसार रात्री ११ ते पहाटे ५ या वेळेत नाईट कर्फ्यू लागू असणार आहे. पर्यटनस्थळे, स्विमिंग पूल जिम, स्पा, मैदाने, उद्याने बंद ठेवण्यात येणार आहेत. शाळा-महाविद्यालये १५ फेब्रुवारीपर्यंत बंद असतील. सरकारी व खाजगी कार्यालये, सलूनमध्ये ५० टक्के क्षमतेचे बंधन आहे. सिनेमागृहे, नाट्यगृहे तसेच हॉटेल्स रात्री १०पर्यंत ५० टक्के क्षमतेने सुरू राहतील. दोन डोस पूर्ण झालेल्यांनाच सार्वजनिक वाहतूक सेवेचा लाभ घेता येणार. खासगी कंपन्यांतही दोन डोसशिवाय प्रवेश नसेल. लग्नासाठी ५०, तर अंत्यसंस्कारासाठी २० लोकांनाच परवानगी आहे. नवी नियमावली रविवारी मध्यरात्रीपासून लागू होणार आहे. लोकलसेवेवर तूर्त कोणतेही बंधन घातलेले नाही.

**अंतरंग**
नागोठणेकरांना अद्यापही शुद्ध पाण्याची प्रतीक्षा/२
अर्थविषयक घडामोडींचा वेध घेणारे सदर अर्थ प्रहर/४
कबड्डी स्पर्धेत भारत पेट्रोलियम, शिवशक्ती संघ विजेते/६

### लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण

# १३ जानेवारीला भूमिपुत्र परिषद, तर २४ जानेवारीला विमानतळ काम बंद आंदोलन



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : हरेश साठे**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे यासाठी 'दिबा'साहेबांच्या जयंतीचे औचित्य साधून रायगड, ठाणे, मुंबई, नवी मुंबई, पालघर या जिल्ह्यांतील समस्त भूमिपुत्रांची १३ जानेवारीला भूमिपुत्र परिषद, तर २४ जानेवारीला विमानतळ काम बंद आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने शनिवारी (दि. ८) पनवेल येथे पत्रकार परिषदेत देण्यात आली. पुन्हा एकदा एल्गार करण्याची तयारी पूर्ण झाली असल्याचे या वेळी अधोरेखित करण्यात आले असून जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत लढाई सुरूच राहणार असल्याची गर्जना करण्यात आली.

आगरी समाज मंडळाच्या महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेस समितीचे कार्याध्यक्ष माजी खासदार संजीव नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, **(पान २ वर..)**

**लोकनेते दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव विमानतळाला लागलेच पाहिजे ही भूमिका अनेकदा आंदोलन आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या बैठकीत विषद झाली आहे आणि भूमिपुत्रांना काय म्हणायचे आहे हेही त्यातून स्पष्ट झाले आहे, मात्र सिडको आणि राज्य सरकार भूमिपुत्रांच्या न्यायिक भावनेकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहे. जोपर्यंत 'दिबा'साहेबांचे नाव विमानतळाला मिळत नाही तोपर्यंत हा लढा कायम असेल.**

**-आमदार प्रशांत ठाकूर,** कार्याध्यक्ष, सर्वपक्षीय कृती समिती

**भूमिपुत्रांच्या जिव्हाळ्याचा हा प्रश्न आहे. ही नुसती लढाई नाही तर हक्क आहे. भूमिपुत्रांच्या परिषदेत स्थानिक, प्रकल्पग्रस्तांच्या हिताचे ठराव मांडले जाणार आहेत. परवानगी आणि कोरोनाचे नियम पाळून ही परिषद होणार आहे.**

**-माजी खासदार संजीव नाईक,** कार्याध्यक्ष, सर्वपक्षीय कृती समिती

**'दिबा'साहेबांचे नाव विमानतळाला मिळालेच पाहिजे आणि तो भूमिपुत्रांचा हक्क आहे. २३ जानेवारीपर्यंत सिडकोकडे वेळ आहे, नाहीतर विमानतळ काम बंद आंदोलन अटळ आहे.**

**-आमदार महेश बालदी,** सदस्य, सर्वपक्षीय कृती समिती

## पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचे बिगूल वाजले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेश, पंजाब, गोवा, उत्तराखंड आणि मणिपूर या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे.



त्यानुसार १० फेब्रुवारी ते ७ मार्च या दरम्यान सात टप्प्यांत मतदान होणार असून १० मार्च रोजी सर्व पाचही राज्यांत मतमोजणी होईल. कोविड संकट असले तरी निवडणूक प्रक्रिया पार पाडणे हे कर्तव्य आहे, असे नमूद करीत केंद्रीय निवडणूक आयुक्त सुशील चंद्रा यांनी शनिवारी (दि. ८) या निवडणुकांची घोषणा केली.

उत्तर प्रदेशची विधानसभा निवडणूक सात टप्प्यांत होणार आहे. पहिल्या टप्प्यातील मतदान १० फेब्रुवारीला, दुसऱ्या टप्प्यातील १४ फेब्रुवारी, तिसऱ्या टप्प्यातील २० फेब्रुवारी, चौथ्या टप्प्यातील २३ फेब्रुवारी, पाचव्या टप्प्यातील २७ फेब्रुवारी, सहाव्या टप्प्यातील ३ मार्च आणि सातव्या टप्प्यातील मतदान ७ मार्च रोजी होणार आहे. पंजाब, उत्तराखंड आणि गोवा येथील सर्व जागांसाठी १४ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे, तर मणिपूरमध्ये २७ फेब्रुवारी आणि ३ मार्च असे दोन टप्प्यांत मतदान होणार आहे. पाचही राज्यांमध्ये एकाच दिवशी १० मार्च रोजी मतमोजणी केली जाणार आहे, असे केंद्रीय निवडणूक आयुक्त सुशील चंद्रा यांनी सांगितले. दरम्यान, निवडणूक होत असलेल्या पाचही राज्यांत तत्काळ प्रभावाने आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

### कडक कोरोना नियम लागू

*निवडणूक होत असलेल्या पाचही राज्यांत कोरोना स्थिती लक्षात घेत आयोगाने कडक नियम लावले आहेत. त्यानुसार रोड शो, पदयात्रा, सायकल यात्रा यांना मनाई करण्यात आली आहे. त्याचवेळी १५ जानेवारीपर्यंत जाहीर सभांवरही निर्बंध आहेत. घरोघरी जाऊन प्रचार करण्यास परवानगी असेल, मात्र केवळ पाचच जण प्रचार करू शकतील. कोविड स्थितीमुळे मतदानावर परिणाम होऊ नये म्हणून मतदानासाठी एक तास अधिक कालावधी देण्यात येणार आहे. सर्व निवडणूक कर्मचारी लसीकरण झालेले असतील. मतदान केंद्रांवर मास्क आणि सॅनिटायझरची व्यवस्था करण्यात येईल, तसेच निकालानंतर विजयी मिरवणूक काढण्यासही पूर्णत: मनाई करण्यात आली आहे, असे केंद्रीय निवडणूक आयुक्त सुशील चंद्रा यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.*

### निवडक

#### मराठा आरक्षणासंदर्भात १२ जानेवारीला सुनावणी

**मुंबई :** मराठा आरक्षणासंदर्भात १२ जानेवारीला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. लोकसभेच्या अधिवेशनात आरक्षण देण्याचा अधिकार राज्य सरकारला देण्यात आला असून हाच मुद्दा विनोद पाटील सुप्रीम कोर्टात उपस्थित करणार आहेत. मराठा आरक्षण सुप्रीम कोर्टाने रद्द केल्यानंतर पाटील यांच्या वतीने पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर १२ जानेवारी रोजी न्यायमूर्तींच्या दालनात सुनावणी होणार आहे.

#### वैद्यकीय पदवी आणि पदव्युत्तर परीक्षा लांबणीवर

**नाशिक :** कोरोनासह ओमायक्रॉनचा प्रादुर्भाव लक्षात घेता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या वैद्यकीय परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या परीक्षा १४ फेब्रुवारीपासून, तर पदवीच्या परीक्षा २८ फेब्रुवारीपासून होणार आहेत.

## कोरोना प्रादुर्भाव होत असतानाही महाडमधील कोविड केअर सेंटर बंदच

### बाधित रुग्ण हतबल



**महाड : प्रतिनिधी**

कोरोना रुग्णांचा आकडा वाढत आहे. अशा परिस्थितीत उपाययोजना करणे आवश्यक असताना महाडमध्ये कोरोना रुग्णांच्या उपचारासाठी सुरू केलेले कोविड केअर सेंटर बंद आहे. त्यामुळे रुग्णांनी जायचे कुठे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

महाडमध्ये गेल्या चार दिवसांपासून कोरोना रुग्णांचा आकडा वाढत चालला आहे. विन्हेरे विभागातील न्यू इंग्लिश स्कूल या माध्यमिक विद्यालयात एकाच दिवशी १५ विद्यार्थी आणि दोन शिक्षक कोरोना पॉझिटिव्ह आढळून आले आहेत. त्याचप्रमाणे केईएस या विद्यालयातदेखील काही विद्यार्थी कोरोनाबाधित आढळल्याने एकच खळबळ माजली आहे. महाडमध्ये रुग्णसंख्या १००च्या वर गेली आहे. शासनाने खबरदारीचा उपाय म्हणून शाळा बंद केल्या असल्या तरी दैनंदिन व्यवहार सुरळीत असल्याने कोरोना संसर्ग अटकाव करण्यास अडथळे निर्माण झाले आहेत. अशातच कोरोना रुग्णांवर उपचार करण्यासाठी शासनाने उभे केलेले कोविड केअर सेंटर लॉकडाऊन संपल्यानंतर बंद करण्यात आले. ते अद्याप सुरू झालेले नाहीत.

महाडमध्ये सुरुवातीच्या काळात महाड ग्रामीण रुग्णालयात कोविड केअर सेंटर कार्यान्वित होते. या ठिकाणी वैद्यकीय अधीक्षक डॉ. भास्कर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांवर चांगल्या पद्धतीने उपचार सुरू होते, मात्र स्थानिक नेतृत्वाला हे मान्य नव्हते आणि केवळ कारखानदारांच्या हट्टापाई राज्य सरकारने एमआयडीसीमध्ये कोविड केअर सेंटर सुरू करून ग्रामीण रुग्णालयातील सेंटर बंद केले. **(पान २ वर..)**



**पनवेल : भाजपचे ज्येष्ठ नेते, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे उपकार्याध्यक्ष, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे जनरल सेक्रेटरी वाय. टी. देशमुख यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शनिवारी शुभेच्छा दिल्या.**

## रिक्षा अपघातात दाम्पत्याचा मृत्यू

**रेवदंडा : प्रतिनिधी**

भोईघरनजीक बामणकोंडी वळणावर शुक्रवारी (दि. ७) रात्री रिक्षा उलटून दाम्पत्याचा मृत्यू झाला, तर रिक्षाचालक बचावला आहे.

जगदिश मोतिराम वणे (वय ३५) व ज्योत्स्ना जगदिश वणे (वय २८, दोघेही रा. डोंबिवली) अशी मृत पती-पत्नीची नावे आहेत. हे दाम्पत्य शुक्रवारी रात्री साडेआठच्या सुमारास रिक्षेने काजूवाडी ते भोईघरमार्गे बोर्लीकडे येत होते. बामणकोंडी वळणावर त्यांची रिक्षा उलटली. या अपघातात जखमी झालेल्या दाम्पत्याला लागलीच बोर्ली प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. तेथील डॉक्टरांनी त्या दोघांना तपासून मृत घोषित केले. या अपघातात रिक्षाचालक अभिषेक चंद्रकांत राजापरकर (वय २२) सुदैवाने बचावले. अपघाताची नोंद रेवदंडा पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

## रायगडात 'अवकाळी'; शेतकरी, बागायतदार संकटात

**म्हसळा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात शनिवारी (दि. ८) अवकाळी पावसाने हजेरी लावली. जिल्ह्याच्या अनेक भागांत जलधारा बरसल्या. त्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली, तर शेतकरी, बागायतदार धास्तावले.

गेले काही दिवस रायगडकर थंडी, धुके याचा अनुभव घेत असताना शनिवारी सकाळपासूनच हवामान ढगाळ होते. दुपारनंतर पाऊस सुरू झाला. त्यामुळे भातपीक, कडधान्य, भाजीपाला तसेच आंबा बागांना हंगामाच्या फटका बसला आहे. आधी निसर्ग व नंतर तोक्ते चक्रीवादळानंतर आंबा व काजू बागायतदारांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. अशातच सातत्याने पडणारा अवकाळी पाऊस त्यांच्या चिंतेत भर घालत असल्याचे चित्र आहे.

## भाजी विक्रेत्याचा मुलगा सैन्यदलात दाखल

### कर्जतकरांकडून उत्स्फूर्त स्वागत

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरात राहणारा २२ वर्षीय गणेश सुभाष लोवन्सी हा एका भाजी विक्रेत्याचा मुलगा सैन्यदलात भरती झाला आहे. तो नुकताच नाशिक येथील प्रशिक्षण संपवून कर्जतमध्ये आला. त्याचे नागरिकांनी उत्स्फूर्त स्वागत केले. गेल्या चार दिवसांत तालुक्यातील हा दुसरा तरुण आहे, ज्याची सैन्यदलात निवड झाली.

गणेश हा मूळचा मध्य प्रदेशातील इंदोरचा, परंतु त्याच्या तीन पिढ्या कर्जतमध्येच वास्तव्यात आहेत. गणेशचे बारावीपर्यंतचे शिक्षणही येथेच झाले. त्याचे वडील सुभाष आणि आई दुर्गा भाजी विक्रेते आहेत. गणेशला शालेय जीवनापासूनच लष्करातील जवानांबद्दल आकर्षण होते. त्यामुळे आपण सैन्य दलात भरती होऊन देशाची सेवा करावी असे त्याने तेव्हाच मनाशी ठरविले होते आणि त्याला त्यासाठी आई-वडिलांनी पूर्ण पाठिंबा दिला.



(छाया : विजय मांडे)

गणेशची नियुक्ती गुजरातमध्ये झाली आहे. तो १ फेब्रुवारी रोजी आपल्या पहिल्या पोस्टिंगवर रूजू होणार आहे. कर्जत शहरात येताच गणेशचे कर्जतकरांनी स्वागत आणि अभिनंदन केले. त्यानंतर त्याची निवासस्थानापर्यंत मिरवणूक काढण्यात आली.

***कोल्हापूर, सातारा, सांगली जिल्ह्यातील युवकांचा ओढा सैन्यदलात जाण्याकडे असतो. त्याप्रमाणे रायगड जिल्ह्यातील विशेषत: आपल्या तालुक्यातील युवकांनीही सैन्यात जाऊन देशाची सेवा करावी. माझ्या या यशाचे श्रेय आई-बाबा आणि माझे गुरू दया शितोळे यांना जाते.***

**-गणेश सोलंकी,** नवनियुक्त सैनिक



# मुंबई महापालिकेत ५०० कोटींचा भ्रष्टाचार

## । भाजप आमदाराचा आरोप; थेट मुख्यमंत्र्यांना पत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईचा विकास आराखडा मंजूर करताना विविध आरक्षणे प्रस्तावित केली होती. परंतू मुंबई महानगर पालिकेच्या भ्रष्ट कारभारामुळे आता उद्याने आणि खेळाचे मैदान पूर्णपणे नामशेष झाले आहेत, असा आरोप करत भाजप आमदार योगेश सागर यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना एक पत्र लिहिले आहे. मुंबई महापालिका अजमेरा बिल्डरवर मेहेरबान आहे. मुंबईतील शहरातील उद्यानांसाठी लागणारी जागा महापालिकेने अजमेरा बिल्डरला दिल्याचा गंभीर आरोप योगेश सागर यांनी केला आहे.

मुंबई शहरातील उद्यानांसाठी असणारी जागा महापालिकेने अजमेरा बिल्डरला दिली आहे. त्या बदल्यात बफर झोनमध्ये असणारी लँड लॉकिंग जागा जी विकासासाठी अनुकूल नाही ती ताब्यात घेतली आहे. यात सरळ सरळ ५०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. मुंबईकरांची हक्काची जागा बिल्डरांच्या घशात घालण्याचा हा डाव असल्याचे गंभीर आरोप योगेश सागर यांनी केलाय. महत्त्वाची बाब म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयालाही केराची टोपली दाखवली. बिल्डरवर एवढे विशेष मेहेरबानी दाखवत महापालिकेचे ५०० कोटीचे नुकसान केले. हा निर्णय मागे घेतला नाही तर या विरोधात भाजप आक्रमक भूमिका घेणार असल्याचा इशाराही सागर यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्राच्या माध्यमातून दिला आहे.

मुंबईचा विकास आराखडा मंजूर करताना विविध आरक्षणे प्रस्तावित केली होती, परंतु मुंबई पालिकेच्या भ्रष्ट कारभारमुळे आता उद्याने व खेळाचे उद्याने पुर्णपणे नामशेष झाले आहेत. अशा परिस्थिति मनपाच्या ताब्यातील उद्यानाकरिता आरक्षित, कोणतेही अतिक्रमण नसलेला बांधकाम योग्य भूखंड अजमेरा बिल्डरला अदलाबदली देण्यात आला आहे. बदल्यात अजमेरा बिल्डरकडे असणारा बांधकाम अयोग्य व पर्यावरणविषयक परवानग्याच्या कचाट्यात अडकणारा भूखंड मुंबई महापालिकेने माहुल पम्पिंग स्टेशनकरिता ताब्यात घेतला आहे, परंतु यातील खरा गैरव्यवहार स्पष्ट आहे, तो म्हणजे अजमेरा बिल्डरची पर्यावरणविषयक परवानग्या मिळवण्याच्या अनंत अडचणीतून सुटका करणे आणि या आदलाबदलीच्या व्यवहारात त्याचा सरळ सरळ ५०० कोटींचा फायदा करून देणे! त्यामुळे मुंबईकरांची हक्काची जमिन बिल्डरच्या घशात घालण्याचा घाट सत्ताधरी सेना व महाविकास आघाडीच्या साथीदारांनी घातला आहे.




विशेषत: या अदलाबदलीच्या प्रस्तावावर सभागृहात कोणतीही चर्चा न करता मंजूरी कशाप्रकारे देण्यात आली? याचा अर्थ ही अदलाबदल फक्त भूखंडाचे श्रीखंड चाखण्यासाठीच केली गेली, हे स्पष्ट आहे. आपण या ५०० कोटीच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात त्वरीत स्थगितीचे आदेश निर्गमित करावे, अन्यथा मला योग्य त्या कायदेशीर बाबीचा मार्ग स्वीकारावा लागेल, असे आमदार योगेश सागर यांनी पत्रात म्हटले आहे.

## आमदार आशिष शेलारांना जीवे मारण्याची धमकी

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे नेते आणि आमदार आशिष शेलार यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. आशिष शेलार यांना सतत दोन वेगवेगळ्या मोबाइल नंबरवरून अज्ञात व्यक्ती धमकी देत असून शिवीगाळ करत असल्याची माहिती समोर आली आहे.

या घटनेनंतर शेलार यांनी मुंबई पोलीस आयुक्तांना पत्र लिहून तक्रार केली आहे. दोन्ही मोबाइल नंबरची माहिती देऊन याबाबत तपास करण्याची विनंती केली आहे.

यापूर्वी एकदा २०२०मध्ये अशाच प्रकारे धमकी देणाऱ्याला वांद्रे पोलिसांनी मुंब्रा येथून अटक केली होती. तर त्यापूर्वी आमदार आशिष शेलार यांच्यासह अन्य दोन हिंदुत्ववादी व्यक्तींची दहशतवाद्यांनी रेकी केल्याची माहिती समोर आली होती. आता पुन्हा दहशतवाद्यांकडून नागपूरात संघ मुख्यालयाची रेकी करण्यात आल्याचे उघड झाले आहे.

## नागोठणेकर शुद्ध पाण्याच्या प्रतीक्षेत

### १० वर्षांपूर्वी मंजूर झालेली योजना रखडली

**नागोठणे : प्रतिनिधी**

राज्याचे तत्कालीन मंत्री व आताचे खासदार सुनील तटकरे यांनी १० वर्षांपूर्वी नागोठण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून मंजूर केलेली पाणी योजना अजूनही पूर्णत्वास आलेली नाही. अलीकडेच संबंधित अधिकारी व ठेकेदारांची बैठक घेऊन तीन महिन्यांत ही योजना चालू करण्याचे आदेश पालकमंत्री आदिती तटकरे यांनी दिले असताना मुदत उलटूनही योजना सुरू झालेली नाही. यामुळे या योजनेतून शुद्ध पाणी नागरिकांपर्यंत कधी पोहचणार, असा सवाल व्यक्त होत आहे.

विशेष बाब म्हणून मंजूर केलेल्या कोट्यवधींच्या या योजनेचे औपचारिक उद्घाटन १० वर्षांचा कालावधी उलटूनही पूर्ण झालेले नाही. आतापर्यंत या योजनेचे पाणी नागरिकांना घरोघरी पोहचायला पाहिजे होते, मात्र तसे झालेले नाही. तीन महिन्यांपूर्वी पालकमंत्री आदिती तटकरे यांनी सर्व संबंधितांची बैठक घेत संताप व्यक्त केला होता, पण त्याचा काहीही परिणाम संबंधितांवर झालेला दिसत नाही.

या योजनेच्या आराखड्यातील पाइपलाइन अजूनही सर्व घरापर्यंत पोहचलेली नाही. टाकीला भेगा पडलेल्या आहेत. यासाठी जी कमिटी बनविली गेली होती त्या कमिटीच्या सभासदांना विश्वासात घेत नाहीत, अशा अनेक तक्रारी आहेत.

# विविध परीक्षांतील यशस्वी विद्यार्थ्यांचा जासईत सत्कार

**उरण : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये विविध परीक्षांतील यशस्वी विद्यार्थ्यांचा 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ८) सत्कार करण्यात आला. दहागाव विभागातर्फे विद्यालयातील नूतनीकरण केलेला मुख्याध्यापक कक्ष, अटल टिंकरिंग लॅब व पाणपोईचे उद्घाटन सोहळ्यात हा कार्यक्रम झाला.



शिष्यवृत्ती मिळलेल्या आदिती म्हात्रे, कृणाल मेटकरी, तेजस कांबळे तसेच एमटीएस परिक्षेत यशस्वी झालेल्या साक्षी व्हनमाने आणि प्रतिक्षा पाटील हिचा उपस्थित मान्यवरांनी सत्कार करत पुढील वाटचाली करीता सदीच्छा दिल्या. दरम्यान, या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जासई विद्यालयातील अडी-अडचणी समजून घेऊन विद्यालयाच्या प्रांगणातील जुनी मोडकळीस आलेल्या इमारतीचे नवीन बांधकाम करण्यासाठी भरीव मदतीचे आश्वासन दिले.

या कार्यक्रमाला 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य जे. एम. म्हात्रे, स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन अरुण जगे, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य व कामगार नेते सुरेश पाटील, जासई ग्रामपंचायत सरपंच संतोष घरत यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या वेळी रयतचे लाईफ मेंबर प्रमोद कोळी, रवींद्र भोईर, सल्लागार समिती सदस्य गोपीनाथ ठाकूर, 'रयत'चे रायगड विभागीय अधिकारी आर. पी. ठाकूर, जासई विद्यालयाचे स्कूल कमिटी सदस्य मधुशेठ पाटील, जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य अरुण घाग, उपप्राचार्य पी. पी. मोरे, सहाय्यक विभागीय अधिकारी एस. एस. फडतरे, रयत सेवक संघाचे अध्यक्ष नुरा शेख, माजी सरपंच रजनी घरत, अमृत ठाकूर, सुनील घरत, चंद्रकांत पाटील, वीर वाजेकर फुंडे कॉलेजचे प्राचार्य बी. टी. पवार, फुंडे हायस्कूलचे प्राचार्य मोहन पाटील, दापोली-पारगाव कॉलेजच्या प्राचार्य पुष्पलता ठाकूर, करंजा येथील शाळेचे मुख्याध्यापक ए. टी. पाटील, फुंडे हायस्कूलचे पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, जासई विद्यालयाचे पर्यवेक्षक साळुंखे, जगदीश म्हात्रे, व्हॉईस चेअरमन श्री रामभाऊ घरत यांच्यासह दहा गाव स्कूल कमिटी सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षणप्रेमी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक उपस्थित होते.

## मुख्यमंत्र्यांना १० लाख पत्र पाठविण्यास आजपासून सुरुवात -विक्रांत पाटील

**पनवेल : वार्ताहर**

विद्यार्थ्यांच्या आयुष्याची राखरांगोळी करणारे विद्यापीठ कायदा सुधारणा विधेयक (काळे विधेयक) महाविकास आघाडी सरकारने मुद्दाम घाईघाईने पारित करून घेतले. या माध्यमातून प्र. कुलपती हे नवीन पद तयार करून कुलपतींचे अधिकार उच्च तंत्र शिक्षण मंत्री यांना दिले जाणार आहेत. त्यामुळे या काळ्या विधेयकाला विरोध करीत विद्यार्थी बांधवांना सोबत घेऊन १० लाख पत्र भारतीय जनता युवा मोर्चा रविवार (दि. ९)पासून मुख्यमंत्र्यांना पाठविणार आहोत, अशी माहिती भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांनी दिली.



विद्यापीठांना राजकारणाचा अड्डा बनविण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे, असा आरोप भाजपा युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांनी केला आहे. भविष्यात कुलगुरूंच्या नियुक्त्या, विद्यार्थ्यांच्या पदव्या या सगळ्यातच आरोग्य सेवक भरती परीक्षा, म्हाडा परीक्षा प्रमाणे कोट्यवधींच्या भ्रष्टाचाराचे विषय करण्यासाठी यांना हे प्र. कुलपती पद पाहिजे का? हा प्रश्न विद्यार्थी विचारात आहेत. त्यामुळे या विधेयकाला विरोध करत १० लाख पत्र मुख्यमंत्र्यांना पाठविणार आहे. तसेच ज्यांचा या काळ्या कायद्याला विरोध आहे त्यांनी ७७४५०५०१११ या क्रमांकावर मिसकॉल द्यावा, असेही आवाहन विक्रांत पाटील यांनी केले आहे.

## खारघरमधील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात भित्तीपत्रिका स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील नेचर क्लब विभागाच्या वतीने शनिवारी (दि. ८) ऑनलाइन भित्तीपत्रिका स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.



या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय मराठे आयक्यूएसीचे समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे व इतर प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी आयोजित स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनींनी आपल्या विविध रचना आणि कला-गुणांचे प्रदर्शन करून विविध भित्तीपत्रिका सादर केल्या.

ही स्पर्धा ऑनलाइन माध्यमातून आयोजित करण्यात आली. या स्पर्धेसाठी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्तम प्रतिसाद दिला. या स्पर्धेचे आयोजन नेचर क्लब विभागाच्या अध्यक्ष प्रा.सफिना मुकादम यांनी केले. तसेच प्रा. सानिया नाचन, प्रा. भरत सोलंकी यांनी सहकार्य केले. प्रा. स्नेहा चोगले यांनी या स्पर्धेचे निरिक्षण केले.

या स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिध्देश्वर गडदे यांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले.

## नगरसेवक मनोहर म्हात्रे यांच्या प्रयत्नांना यश

### पनवेल मनपाच्या महासभेत विकासकामांना मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नगरसेवक मनोहर म्हात्रे यांच्या प्रयत्नांतून पनवेल महापालिकेच्या महासभेत प्रभाग क्रमांक १४मधील धाकटा खांदा, पटेल मोहल्ला आणि मोठा खांदा या ठिकाणी मलनिस्सारण वाहिन्या, पावसाळी गटारे आणि विद्युत वाहिन्या भूअंतर्गत करणे या कामांना मंजुरी मिळाली आहे.



धाकटा खांदा, पटेल मोहल्ला आणि मोठा खांदा येथील नागरिकांना सुविधा मिळण्याच्या उद्देशाने नगरसेवक मनोहर म्हात्रे यांनी महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेचे लक्ष वेधले होते. या ठिकाणी मलनिस्सारण वाहिन्या, पावसाळी गटारे आणि विद्युत वाहिन्या ही कामे करण्यासाठी महापालिकेच्या महासभेत संबंधित विषय मंजूर करण्यात आले आहेत.


धाकटा खांद्यात होणाऱ्या कामाची अंदाजित रक्कम १० कोटी ४१ लाख रुपये, मोठा खांदा कामाची अंदाजित रक्कम चार कोटी २५ लाख रुपये, तर पटेल मोहल्ला येथे होणाऱ्या कामाची अंदाजित रक्कम सहा कोटी रुपये आहे. या कामांना लवकरच सुरुवात होणार असल्याने येथील नागरिकांनी नगरसेवक मनोहर म्हात्रे यांचे आभार मानले आहेत.

## उर्मिला पावसकर

**दुखवटा**



**कळंबोली :** पेंधर येथील संतोष नगरमधील रहिवासी उर्मिला विठ्ठल पावसकर यांचे शुक्रवारी (दि. ७) सकाळी निधन झाले. कै. उर्मिला पावसकर यांच्यावर कळंबोलीतील स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी नगरसेवक संतोष भोईर यांच्यासह रहिवासी उपस्थित होते.


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
रविवार, दि. ९ जानेवारी २०२२ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा-उरण नाका, पनवेल
- ३. आय. टी. एम. कॉलेज, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
- ८. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- ९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- १०. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- ११. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १२. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १३. न्यू इंग्लिश स्कुल, कळंबोली

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

कोवॅक्सिन

- १. काळभैरव कार्यालय, कळंबोली
- २. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

१५ ते १८ वयोगटाचे लसीकरण

- केंद्रीय विद्यालय ओएनजीसी, पनवेल (उपलब्ध लसी ५५६)
- महात्मा मराठी, इंटरनॅशनल (सी.बी.एस.ई.) शाळा, खांदा कॉलनी (५००)
- शांतीनिकेतन पब्लिक स्कूल, न्यू पनवेल (२४७)
- आगरी स्कूल (११७)
- ज्ञानज्योत विद्यामंदिर सेकंडरी स्कूल, खारघर (३८७)
- विश्वज्योत हायस्कूल खारघर (२३४)
- पॉलिटेक्निक इंजिनिअरींग कॉलेज (१४९)
- सेंट जोसेफ माध्यमिक हायस्कूल, कळंबोली (२६६)
- महाराष्ट्र स्कूल, कळंबोली (१२१)
- राव ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स खारघर (२०७)
- कॉन्वेंट ऑफ जिजस अँड मेरी हायस्कूल खारघर (४७५)
- न्यू इंग्लिश स्कूल नावडे (२५७)
- गोखल एज्युकेशन सोसायटी हायस्कूल, खारघर (१९४)


पान १ वरून

## १३ जानेवारीला भूमिपुत्र परिषद, तर २४ जानेवारीला विमानतळ काम बंद आंदोलन

सरचिटणीस भूषण पाटील, माजी उपमहापौर जगदिश गायकवाड, सहचिटणीस गुलाब वझे, संतोष केणे, राजेश गायकर, दीपक म्हात्रे, खजिनदार जे. डी. तांडेल, सदस्य नंदराज मुंगाजी, रूपेश धुमाळ, दशरथ भगत, दीपक पाटील, विनोद म्हात्रे, विजय गायकर, जयेश आक्रे, भुवनेश्वर धनू, जितेंद्र म्हात्रे, गजानन मांगरूळकर, सुनील पाटील, डी. बी. पाटील यांच्यासह पनवेल, उरण, नवी मुंबई, मुंबई, ठाणे, कल्याण आदी विभागांतील प्रकल्पग्रस्त समितीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी पत्रकारांना माहिती देताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की, समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील यांच्या पत्नीची प्रकृती ठीक नसल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे ते आजच्या पत्रकार परिषदेला येऊ शकले नाहीत. पुढे त्यांनी म्हटले की, पनवेल, उरण, नवी मुंबई, मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली या प्रकल्पग्रस्तांच्या सर्व संघटना प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांचे अस्तित्व जपण्याचे काम करीत आहेत. भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांना काम देणे ही जबाबदारी सरकारची आहे. प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न आहेत. ते मार्गी लावण्याबरोबरच लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव विमानतळाला लागलेच पाहिजे ही सर्व भूमिपुत्रांची आग्रही आणि रास्त मागणी आहे. मागील वर्षी १० जून, २४ जून आणि ९ ऑगस्टच्या आंदोलनानिमित्ताने लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाने सारा भूमिपुत्र समाज एकवटला. लाखोंच्या संख्येने सहभागी झालेल्या भूमिपुत्रांची ताकद संपूर्ण भारताने पाहिली. आता 'दिबां'च्या जन्मदिनी म्हणजेच १३ जानेवारी रोजी भव्य भूमिपुत्र परिषद पनवेल तालुक्यातील कोल्ही कोपर गावात दत्त मंदिराजवळ विमानतळ परिसरात आयोजित करण्यात आली आहे. आणि ही परिषद म्हणजे प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांच्या अस्मितेची, अस्तित्वाची आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव करून देणारी आहे, तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव द्यावे या मागणीसाठीची आहे.

नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव देण्यासाठीचा लढा उभा करताना रायगड, ठाणे, मुंबई, नवी मुंबई, पालघर अशा विविध जिल्ह्यांतील भूमिपुत्र या ऐतिहासिक आंदोलनात सहभागी झाले. या सर्व भूमिपुत्रांचे जेथे राहतात तेथे वेगवेगळे संघर्ष आज उभे आहेत. त्यांच्या या संघर्षांमध्ये त्यांना सोबत करणे, त्यांच्या विषयांकडे शासनाचे लक्ष वेधून घेणे हीसुद्धा या लढ्याची जबाबदारी आहे आणि याच भावनेतून येत्या १३ जानेवारीला ही भूमिपुत्र परिषद होत आहे. या माध्यमातून आपल्या सर्व विषयांची उजळणी होणार आहे. हे सर्व प्रश्न मार्गी लावण्यासाठी सरकारला अल्टिमेटम देण्यात येणार आहे. त्यानंतरच्या पुढील टप्प्याची माहिती देताना सांगण्यात आले की, राज्य सरकार भूमिपुत्रांच्या अस्तित्वाकडे दुर्लक्ष करीत आहे. सिडकोचा ठराव रद्द करून नव्याने लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाचा ठराव करून राज्य सरकारला द्यावा आणि तो प्रस्ताव राज्य सरकारने केंद्र सरकारला द्यावा ही आग्रही मागणी सातत्याने भूमिपुत्रांकडून होत असतानाही त्याला वाटाण्याच्या अक्षता लावण्याचे काम सिडको आणि ठाकरे सरकार करीत आहे. त्यामुळे २४ जानेवारीला विमानतळाचे सुरू असलेले सर्व काम बंद पाडण्यात येणार आहे, असा एल्गारही या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समितीच्या वतीने जाहीर केला.

## कोरोना प्रादुर्भाव होत असतानाही महाडमधील कोविड केअर सेंटर बंदच

दरम्यान, कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत गेल्याने महाडमधील कोविड केअर सेंटरकडे दुर्लक्ष करण्यात आले, मात्र सध्या महाडमध्ये कोरोनाचा फैलाव वेगाने होत असताना हे केंद्र सद्यस्थितीत बंदच आहे. कोरोनाच्या वाढत्या संसर्गामुळे शासनाने अनेक ठिकाणची कोविड केअर सेंटर सुरू केली आहे. मग महाडमधील सेंटर बंद का, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

निवडक



## चित्रकला स्पर्धेत नूपूरला पारितोषिक

**उरण :** आझादी का अमृत महोत्सवानिमित्त रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने आयोजित पॅन इंडिया अवेअरनेस प्रोग्राम अंतर्गत बेटी बचाव बेटी पढाव या विषयावर शालेय मुलांसाठी जिल्हा पातळीवर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये उरण एज्युकेशन सोसायटी शाळेमधील नुपूर विरेंद्र म्हात्रे हिने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले. विजेत्या स्पर्धकाला पारितोषिक वितरण करण्यासाठी दिवाणी न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश एन. एम. वाली, सह दिवाणी न्यायाधीश आर. बी. पोळ, दूसरे सह दिवाणी न्यायाधीश पी. एन. पठाडे आणि उरण एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त ॲड. राजेंद्र भानुशाली उपस्थित होते.

## पान मसाला, सुगंधी तंबाखू हस्तगत

**पनवेल :** मानवी आरोग्यास अपायकारक असा प्रतिबंधीत पान मसाला व सुगंधीत तंबाखूचा साठा हस्तगत करण्यात आली आहे. हे पदार्थ बाळगल्याप्रकरणी तालुका पोलिसांनी आजिवली गाव परिसरातून दोघांना ताब्यात घेतले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक धनश्री पवार, शिपाई सतीश दराडे व पथकाने अजिवली गाव येथे छापा टाकून दिनेश राम जतन मोरया (वय २२) व राजेश फुलचंद चौरसिया (वय ३७) या दोघांना मोटरसायकलीसह ताब्यात घेतले. त्यांच्याकडून २५ हजार ९८७ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

## पनवेलमधून गाडीची चोरी

**पनवेल :** १० लाख रुपये किमतीची हुंडाई क्रेटा गाडीची चोरी केल्याची घटना शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटी येथे घडली आहे. सुर्यकांत कोळी हे आशादीप बिल्डींग प्लॉट नं.११९ येथे राहण्यास असून त्यांनी त्यांची १० लाख रुपये किमतीची हुंडाई क्रेटा गाडी (एमएच-४६-बीक्यू-३२०४) ही त्यांच्या राहत्या बिल्डींगसमोर उभी करून ठेवली होती. या वेळी अज्ञात चोरट्याने ही गाडी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## घरातून मोबाइल चोरला

**पनवेल :** घरात ठेवलेला मोबाइल फोन अज्ञाताने चोरून नेल्याची घटना पळस्पे फाटा येथील एका सोसायटीमध्ये घडली आहे. सानिया फिरोज पठाण (रा.समरपार्क, शिफा हॉस्पिटलच्या पाठीमागे) त्यांनी १० हजार रुपयांचा मोबाइल राहत्या घरातील हॉलमध्ये ठेवला होता. या वेळी कुणीतरी अज्ञात चोरट्यांनी हा मोबाइल चोरून नेला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# कोरोनाविरोधी बूस्टर डोससाठी तयारी

## ▪ नवी मुंबई महापालिका आरोग्य विभाग सज्ज

**नवी मुंबई : बातमीदार**

कोव्हीड लसीकरणामध्ये १५ ते १८ वयोगटातील मुलांच्या लसीकरणाला ३ जानेवारीपासून सुरुवात करण्यात आलेली असून चार दिवसात ३६, ३५६ मुलांचे लसीकरण झालेले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार १० जानेवारीपासून आरोग्यकर्मी, पहिल्या फळीतील कोरोना योध्दे तसेच सहव्याधी असणारे ६० वर्षांवरील नागरिक यांनाही प्रिकॉशन डोस (बुस्टर डोस) दिला जाणार आहे. महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी याबाबत २७ डिसेंबरला तातडीने विशेष बैठक घेत या लसीकरणाचे सुयोग्य नियोजन केलेले आहे.

यानुसार १० जानेवारीपासून दुसरा डोस घेऊन नऊ महिने किंवा ३९ आठवडे झालेल्या आरोग्यकर्मी, पहिल्या फळीतील कोरोना योध्दे तसेच सहव्याधी असणारे ६० वर्षांवरील नागरिक यांना प्रिकॉशन डोस दिला जाणार आहे. याकरिता महानगरपालिकेची वाशी, नेरूळ व ऐरोली येथील तिन्ही सार्वजनिक रुग्णालये आणि तुर्भे येथील माता बाल रुग्णालय त्याचप्रमाणे २३ प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रांमध्ये सकाळी ९ ते ५ या वेळेत हा प्रिकॉशन डोस देण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

### पात्र लाभार्थ्यांना आयुक्तांचे आवाहन

***नवी मुंबई महानगरपालिकेची रुग्णालये व २३ नागरी आरोग्य केंद्रे याठिकाणच्या लसीकरण केंद्रांवर पहिल्या फळीतील कोरोना योध्दे तसेच सहव्याधी असणारे ६० वर्षांवरील नागरिकांना कोविड लसीचा प्रिकॉशन डोस विनामूल्य दिला जाणार आहे. पात्र लाभार्थ्यांनी प्रिकॉशन डोस घेऊन कोविडपासून अधिक संरक्षण प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.***



जे आरोग्यकर्मी, पहिल्या फळीतील कोरोना योध्दे तसेच सहव्याधी असणारे ६० वर्षांवरील नागरिक यांनी १२ एप्रिल २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी कोविड लसीचा दुसरा डोस घेतला असेल ते लाभार्थी १० जानेवारी २०२२ रोजी प्रिकॉशन डोस घेण्यास पात्र असतील.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व्याख्यान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील स्पर्धा परिक्षा विभागाने वतीने शनिवारी (दि. ८) स्पर्धा परीक्षा कशी करावी? या विषयावर ऑनलाइन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

प्रस्तुत कार्यक्रमास मुंबई विद्यापीठाचे भूगोल विभागाचे प्रा. सुशेन आघाव हे प्रमुख वक्त्या म्हणुन उपस्थित होते. या व्याख्यानामध्ये प्रा. सुशेन आघाव यांनी विद्यार्थ्यांना शंकाचे निरसन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय मराठे आयक्यूएसीचे समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे, व इतर प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रध्दा शिंदे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तसेच महाविद्यालयातील डिएलएलई विभागप्रमुख प्रा. महेश धायगुडे, यांनी प्रमुख वक्त्या प्रा. सुशेन आघाव यांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. मानसी शहा यांनी केले. तर कार्यक्रमाच्या शेवटी प्रा.रेवान शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिध्देश्वर गडदे यांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले.

## गव्हाण विद्यालयात विद्यार्थ्यांचे कोरोना प्रतिबंधक लसीकरण सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी कोविड प्रतिबंधक लसीकरणास प्रारंभ झाला.

या वेळी 'रयत'चे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर, प्रा. राजेंद्र चौधरी, प्रा. उमेश पाटील, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. अस्मिता बोंबटकर, डॉ.आनंद शिंदे व डॉ. आरती गुप्ते, आरोग्य सहायक सुलभा खाडे, आरोग्य सेविका चंद्रकला आग्रावकर त्यांचे सहकारी कर्मचारी उपस्थित होते.

विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे ह्या विद्यालयातील १५ ते १८ या वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांचे लसीकरण तातडीने करवून घेण्यासाठी प्रयत्नशील असून त्या दृष्टीने आरोग्य विभागाशी समन्वय साधून आहेत. सोमवारी (दि. १०) इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात येणार आहे. यादृष्टीने विद्यालयातील सर्व पात्र लाभार्थ्यांच्या याद्या तयार करण्यात आल्या असल्याची माहिती विद्यालयाचे उपप्राचार्य जगन्नाथराव जाधव व पर्यवेक्षक दिपक भर्णुके यांनी दिली. या मोहिमेला आरोग्य विभागाचे विशेष सहकार्य लाभत आहे.



## शांतिवनमध्ये जुळून आले 'ऋणानुबंध'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन या संस्थेतील कार्यकर्ते साईनाथ भोपी, यशवंत बिडये, संदीप डोंगळे, फतीमा फ्रोज, राजेंद्र वानखडे, भगवान बडगुजर, विनोद पाचघरे या सर्वांनी एकत्रित येत ऋणानुबंध या ग्रुपची स्थापना केली आहे. त्यांच्या माध्यमातून शांतिवनात कार्यक्रम घेण्यात आला.



या वेळी महाराष्ट्रातून वेगवेगळ्या ठिकाणाहून ६०पेक्षा अधिक कार्यकर्ते, कुष्ठमित्र उपस्थित होते. कार्यक्रमात शांतीवन उभारण्यासाठी योगदान दिले त्यांना अभिवादन करण्यात आले. कुष्ठरुग्णांचा सन्मान करण्यात आला. कुष्ठरुग्णांसोबत सुरुवातीला कार्यकर्ता म्हणून दमयंती डोंगळे, अण्णा डोंगळे यांनी गावातील लोकांचा आणि कुष्ठबांधवांचा एकोपा आणण्यासाठी मोलाचे योगदान दिले. त्या दमयंती डोंगळे यांचाही या वेळी सन्मान करण्यात आला.

चिंचवलीचे सरपंच रमेश पाटील यांनी या वेळी शांतीवनसाठी २५ हजारांची देणगी जाहीर केली. कार्यक्रमासाठी शांतीवन संचालित बलवंतराय मेहता पंचायतराज जागृती केंद्र यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन यशवंत बिडये यांनी केले. संस्थेच्या अध्यक्ष रक्षा मेहता, पदाधिकारी आदी उपस्थित होते.

## भाजपतर्फे रिक्षाचालकांना मास्कचे वाटप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

देशभरात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता नेरूळ गावदेवी रिक्षा चालक-मालक संघटना आणि ठाणे जिल्हा ऑटोरिक्षा टॅकशी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार गणेश नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांच्या उपस्थितीत नेरूळ सेक्टर २० रेल्वे स्टेशन येथे मास्क वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.




नेरूळमधील रिक्षा चालक, मालक, वाहतूक पोलीस अधिकारी तसेच स्टेशनवरून येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांना मोफत मास्क वाटप करण्यात आले. या वेळी माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांनी आपल्या भाषणात कोरोना संपला असे समजून काही लोकांनी मास्क न घालता सार्वजनिक ठिकाणी बिनधास्त फिरणे, सोशल डिस्टन्सिंगचे पालन न करणे अशा पद्धतीच्या चुका केल्याने अचानक कोरोना रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पुन्हा नागरिकांना जागरूक करण्याची गरज आहे. रिक्षाचालकांनीदेखील प्रवाशांना मास्क घालण्यास सांगावे किंवा मास्क न घातलेल्या प्रवाशांना मोफत मास्क द्यावे, असे सांगितले.

या वेळी माजी नगरसेवक गिरीश म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते शेखर भोपी, नकुल म्हात्रे, गणपत भोपी, देवा म्हात्रे, अक्षय पाटील, संघटनेचे सरचिटणीस विकास सुर्यवंशी, उपाध्यक्ष प्रसन्न कडू, राजेश पाटील, नवी मुंबई आरटीओ प्रतिनिधी सचिन शेलार, सोमनाथ म्हात्रे आदी उपस्थित होते.

## जुन्या वाहनांची नोंदणी महागणार

**खारघर : प्रतिनिधी**

एप्रिल २०२२पासून १५ वर्षे जुन्या वाहनांच्या नोंदणी नूतनीकरणासाठी मालकास तब्बल काहिक अधिक शुल्क भरावे लागणार आहे. त्याचप्रमाणे व्यावसायिक वाहनांच्या फिटनेस सर्टिफिकेटसाठीही अधिक शुल्क भरावे लागणार आहे. वाहनांच्या नोंदणीविषयीचे नवे नियम लागू होत असून रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने यासंबंधीची अधिसूचना जारी केली आहे.

१५ वर्षांनंतर वाहनांच्या नोंदणीचे नूतनीकरण दर पाच वर्षांनी करावे लागेल. आठ वर्षांनंतर व्यावसायिक वाहनांना दरवर्षी फिटनेस सर्टिफिकेट घेणे बंधनकारक असेल. फिटनेस तपासणीसाठी स्वयंचलित यंत्राचा वापर करण्यास प्राधान्य दिले आहे. उशीर झाल्यास लागणार विलंब शुल्कवाहनांच्या नोंदणीच्या वेळेत नूतनीकरण करणे बंधनकारक आहे. नूतनीकरणास उशीर झाल्यास प्रत्येक महिन्यासाठी ३०० रुपये विलंब शुल्क लागेल. व्यावसायिक वाहनांसाठीचे विलंब शुल्क ५०० रुपये असेल. फिटनेस सर्टिफिकेटच्या नूतनीकरणास उशीर झाल्यास दररोज ५० रुपयांचे विलंब शुल्क लागेल.

१५ वर्षे जुन्या वाहनांना जबर पर्यावरण कर व पूर्ण नोंदणी शुल्क लागत असल्याने असे वाहन खरेदी करणे लोक टाळत आहेत. १५ वर्षांवरील कार विक्री करणे बंद केले आहे. सीएनजीची व्यवस्था असलेल्या पेट्रोल कार खरेदीलाच प्राधान्य दिले जात असल्याने ज्यांच्याकडे १५ वर्षे जुनी वाहन आहेत. त्यांना ते पांढरा हत्ती वाटू लागले आहेत. संबंधित गाड्या खरेदी करण्यासदेखील कोणच पुढे येत नसल्याने याबाबत शासनाने अशा वाहन चालकांबाबत काही तरी योजना राबविणे गरजेचे असल्याचे ॲड. सचिन कांबळे यांनी सांगितले.

## नवी मुंबईची 'फ्लेमिंगो सिटी'च्या दिशेने वाटचाल

**नवी मुंबई : बातमीदार**


स्वच्छ सर्वेक्षण २०२२ची तयारी नवी मुंबई महापालिकेने सुरू केली आहे. त्या अनुषंगाने शहरात येणाऱ्या गुलाबी, लाल नारंगी रंगांच्या जगप्रसिद्ध फ्लेमिंगो पक्ष्यांच्या प्रतीकृतींनी शहर सजणार आहे. तर नवी मुंबईत येतानाच प्रवेश मार्गावर वेलकम टू फ्लेमिंगो सिटी असे फलक प्रवाशांचे स्वागत करणार आहेत. त्यामुळे यापूढे नवी मुंबई हे 'फ्लेमिंगो सिटी' म्हणून नावाजले जाणार आहे.

नवी मुंबई पालिकेला उद्यानांचे शहर म्हणून ओळखले जाते. त्याव्यतिरिक्त मुंबईला लागून असल्याने आधुनिक शहराचा दर्जा या शहराला लाभला आहे. या शहराला विस्तीर्ण खाडी किनारा लाभला असून या खाडीत जगप्रसिद्ध अशा फ्लेमिंगो पक्ष्यांचा वावर असतो. ठाणे-ऐरोली येथील खाडीत वनविभागाने फ्लेमिंगो सफारी सुरू केली आहे. टीएस चाणक्य, एनआरआय व ऐरोली येथे येणारे फ्लेमिंगो पक्षी पाहण्यासाठी अगदी मुंबई, ठाणे, पनवेल व इतर परिसरांतून पक्षी निरीक्षक व अभ्यासक येत असतात. त्यामुळे पक्षी अभ्यासकांचे आवडते ठिकाण म्हणून नवी मुंबई प्रसिद्ध आहे.



भिंतीचित्रांमधून 'फ्लेमिंगो सिटी' म्हणून नवी मुंबईची असलेली ओळख अधोरेखित व्हावी याचे प्रभावी सादरीकरण करण्यात येणार आहे. नवी मुंबईच्या प्रवेशद्वारांवर वेलकम टु फ्लेमिंगो असे फलक लावले जाणार आहेत. भिंतीचित्रांप्रमाणे मुख्य चौक, कॉर्नर, दुभाजक अशा दर्शनी ठिकाणी आकर्षक शिल्पाकृती उभारल्या जाणार आहेत. सायन-पनवेल हायवेवर असणाऱ्या विद्युत खांबांवर फ्लेमिंगो पक्ष्यांच्या आकाराची चित्रे बसवण्यात येणार आहेत. यासह नाल्यांवरील जाळ्यांवर फ्लेमिंगो पक्ष्यांची गुलाबी रंगातील चित्रे बसवण्यास सुरुवात झाली आहे. 'थ्री आर' संकल्पनेनुसार टाकाऊपासून टिकाऊ फ्लेमिंगोंच्या शिल्पाकृतींचा अंतर्भाव असणार आहे.

जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात नवी मुंबईत १७ वर्षांखालील आशियाई महिला फुटबॉल चषक होणार आहे. स्पर्धेच्या निमित्ताने जगभरातील विविध देशातील महिला फुटबॉलपटू नवी मुंबईत येणार आहेत. या स्पर्धेचे यजमानपद भूषविताना जानेवारीत होणारी अशियाई फुटबॉल स्पर्धा व त्यानंतर सहा महिन्यांनी होणारी फिफा फुटबॉल स्पर्धा होणार आहे. त्यामुळे जागतिक पटलावरदेखील नवी मुंबईची ओळख फ्लेमिंगो सिटी म्हणून होण्यास मदत होणार आहे.



**"आयुक्तांच्या निर्देशानुसार फ्लेमिंगो सिटीसाठी सुशोभीकरण करण्यात येत आहे. शहर सुशोभीकरणात नवी मुंबईचे वैभव असलेल्या फ्लेमिंगो पक्ष्यांना स्थान देण्यात आले आहे. त्यानुसार नवी मुंबईत येणाऱ्यांना येत्या काळात आकर्षक गुलाबी रंगात फ्लेमिंगो सिटीचे दर्शन होईल.**

**-संजय देसाई, मुख्य शहर अभियंता, नवी मुंबई महानगरपालिका**

शहरात दोन ते अडीच लाख देशी वृक्षांचे मियावाकी प्रकल्प आकारास येत आहेत. त्यामुळे जैवविविधता वाढीस लागणार आहे. कोपरखैरणेत तयार झालेल्या मियावाकी प्रकल्पात जैवविधता वाढल्याचे आढळून येऊ लागले आहे. त्यामुळे यापूढे फ्लेमिंगो पक्ष्यांसोबत मियावाकी प्रकल्प शहराला प्रसिद्धी मिळवून देण्यास हातभार लावेल.

## सिडकोकडून खोपटा नवनगर अधिसूचित क्षेत्र विकास आराखडा

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

महाराष्ट्र शासनाने खोपटा नवनगर अधिसूचित ३२ गावांचा समावेश असलेल्या क्षेत्रासाठी सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार सिडकोने सर्वसमावेशक व उत्तम दर्जाच्या सोयी व सुविधांनी परिपूर्ण विकास करण्यासाठी खोपटा नवनगर क्षेत्राचा विकास आराखडा तयार करण्याच्या इराद्याची सूचना प्रसिध्द् करण्यात आलेली आहे.

खोपटा नवनगर अधिसूचित क्षेत्राच्या विकासाचे उद्दिष्ट पायाभूत आणि सामाजिक सुविधा प्रदान करणे व विकासाच्या विविध क्षेत्रात संधी निर्माण करणे आहे. एकात्मिक प्रोत्साहनार्थ विकास नियंत्रण नियमावली (यूडीसीपीआर) नुसार खोपटा क्षेत्रातील सहा गावांचा मंजूर विकास आराखडा तसेच उर्वरित २६ गावांचा विकास आराखडा परस्पर सुसंगत असावा, यासाठी २६ गावांचा विकास आराखडा तयार करत असतांना सहा गावांच्या मंजूर असलेल्या विकास आराखड्याची फेरतपासणी करुन त्यात बदल करण्याची आवश्यकता आहे.

खोपटा नव शहर अधिसूचित क्षेत्र व नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसुचित क्षेत्र (नैना) या दोन वेगळ्या प्रकल्पाकरिता शासनाने सिडकोस विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे.

खोपटा अधिसूचित क्षेत्राचा विकास आराखड्याचे नियोजन करण्याकरिता सर्व ग्रामपंचायतींना त्यांच्या गावांची आवश्यक अद्यावत माहिती पुरविण्याची विनंती करण्यात आलेली आहे, जेणेकरून विकास आराखड्याचे नियोजन त्या अनुषंगाने तयार करता येईल. शहराचा विकास आराखडा तयार करतांना अस्तित्वातील असलेल्या गावांची वाढ लक्षात घेऊनच नियोजन करण्यात येईल.

खोपटा अधिसुचित क्षेत्राचा विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावली निर्धारित कालावधीत तयार करून विविध टप्प्यावर जनतेकडून सुचना व हरकती मागविण्यात येतील व या सुचनांवर योग्य तो विचार करून शासनास मंजूरीकरिता सादर करण्यात येईल. विकास आराखडा मंजूर केल्यानंतरच पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणीचे धोरण निश्चित केले जाईल.

रविप्रहर


राम प्रहर
www.ramprahar.com

# गुंतवणूक केली, पण तिच्या नोंदींचे काय?

**बँक खाती, जीवनविमा, म्युच्युअल फंड आणि सार्वजनिक भविष्यनिर्वाह निधीमध्ये सुमारे ८२ हजार कोटी रुपये असे पडून आहेत, अशी एक आकडेवारी अलीकडेच प्रसिद्ध झाली आहे. याचा अर्थ कोट्यवधी गुंतवणूकदार आपल्या गुंतवणुकीची पुरेशी काळजी घेत नाहीत असा होतो. आर्थिकदृष्ट्या साक्षर होऊन त्याच्या नोंदी करण्याची सवय लावून घेणे, एवढाच हे नुकसान टाळण्याचा मार्ग आहे.**



अर्थ प्रहर



**यमाजी मालकर**
(ymalkar@gmail.com)

वेळच्या वेळी गुंतवणूक करणे हे जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच महत्त्व त्या गुंतवणुकीच्या नोंदी ठेवण्याला आहे, असे का म्हटले जाते याचे कारण पुढील आकडेवारीवरून स्पष्ट होऊ शकते. बँक खाती, जीवनविमा, म्युच्युअल फंड आणि सार्वजनिक भविष्यनिर्वाह निधीमध्ये सुमारे ८२ हजार कोटी रुपये असे पडून आहेत, जे मागायला कोणी येत नाही. अर्थात, रिझर्व बँक आणि सरकारने अशा निधीविषयी काही नियम केलेले असल्याने गुंतवणूकदाराला किंवा त्याच्या वारसाला त्याची आठवण होते किंवा हरवलेली कागदपत्रे सापडतात तेव्हा त्यांना पुढील काही वर्षे त्यावर हक्क सांगता येतो, पण एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी पडून राहतो, याचा अर्थ सध्याच्या गुंतवणूकदारांनी त्यातून धडा घेण्याची गरज आहे, एवढे नक्की.

वेळप्रसंगी आपल्या गरजा बाजूला ठेवून जी गुंतवणूक केली जाते ती अशी पडून का राहते, असा विचार केल्यास लक्षात असे येते की, कुटुंबातील कर्ता माणूस आपल्यानंतर कुटुंबाला आर्थिक आधार मिळावा म्हणून गुंतवणूक करत असतो. पण तिची माहिती तो कुटुंबातील कोणाला देत नाही. अचानक काही दुर्दैवी होण्याची वेळ आपल्यावर येणार नाही, असा आशावाद प्रत्येकाच्या मनात असतो, ही चांगली गोष्ट आहे. पण व्यवहारात तसे होत नाही. जेव्हा खरोखरच अशी काही दुर्दैवी घटना घडते, तेव्हा त्या कर्त्या माणसाने अनेकदा गुंतवणुकीच्या नोंदी केलेल्या नसतात किंवा त्यासबंधीच्या कागदपत्रांची कामे पूर्ण केलेली नसतात. अशावेळी अशी गुंतवणूक एकतर अनेक वर्षे पडून राहते किंवा ती मिळविण्यासाठी वारसांना प्रचंड त्रास होतो. ही वेळ आपल्यावर किंवा आपल्या वारसांवर येऊ नये यासाठी आपण काय केले पाहिजे आणि अशा गुंतवणूकदारांसाठी सरकार किंवा रिझर्व बँक काय करते आहे, याची माहिती आपल्याला असली पाहिजे.

एक चांगली गोष्ट अलीकडील काळात झाली, ती म्हणजे सर्व आर्थिक व्यवहारांचे होत असलेले डिजिटलायझेशन. जीवनविमा, आरोग्य विमा असो, मोटारींचा इन्शुरन्स असो, बँक खाते, डीमॅट खाते असो की भविष्यनिर्वाह निधी असो, अशा सर्व प्रकारच्या गुंतवणुकीमध्ये वारसदारांची माहिती त्यात आधीच घेतली जाते आहे. ती डिजिटली सांभाळली जात असल्याने त्यासंबंधीची कागदपत्र सांभाळण्याची गरज पूर्वीपेक्षा कमी झाली आहे. शिवाय असे कागदपत्र डिजिटलमुळे मानवी हस्तक्षेपाशिवाय मिळू लागले आहेत. त्यातील काही कागदपत्र तर डीजी लॉकरसारख्या ॲपमुळे आपल्या फोनमध्येच राहतात. अर्थात, ही सोय आहे आणि आपणही ती वापरू शकतो, याचे सर्वांना आकलन होण्यास अजून काही काळ जाईल. या सोयीचा वापर वाढत चालला आहे, एवढे मात्र नक्की. ज्या खात्यांमध्ये अशी रक्कम पडून आहे, त्यासंबंधीची माहिती वारसापर्यंत पोहचविण्याची मोहीम सबंधित संस्थांनी हाती घ्यावी, असे रिझर्व बँकेने सांगितले असल्याने अशा संस्थांकडून पुढाकार घेतला जात आहे.

अलीकडच्या काळातील असे काही पुढाकार आहेत. १. विमा क्षेत्राचे नियंत्रण करणाऱ्या इर्डाने १००० रुपयांपेक्षा अधिक रक्कम पडून असलेल्या गुंतवणूकदारांची माहिती वेबसाईटवर उपलब्ध करण्यास सर्व विमा कंपन्यांना बंधनकारक केले आहे. २. पडून असलेल्या अशा मुच्युअल फंडांची माहिती आपल्या वेबसाईटवर लावण्याचे सेबीने सर्व फंड व्यवस्थापन कंपन्यांना सांगितले आहे. ३. बँक खाते दोन वर्षे वापरले नाही तर त्याचे व्यवहार थांबविण्यात येतात आणि नव्याने केवायसी करण्यास सांगण्यात येते. तरीही ग्राहक बँक खाते सुरू करत नाहीत. त्यामुळे त्यातील रक्कम तशीच पडून राहते. अगदी अलीकडे केवायसी पूर्ण करण्यासाठी काही बँका एक एसएमएस पाठवीत असून त्यात एक लिंक असते. ती माहिती भरली की तुमची केवायसी पूर्ण झाल्याचा एसएमएस येतो. ४. नोकरी बदलली किंवा कमी काळातच थांबली की भविष्य निर्वाह निधीचे खाते वापराविना बंद पडते, असा आतापर्यंतचा अनुभव होता. आता मात्र ही खाती सहजपणे जेथे नोकरी मिळाली आहे, तेथे पोर्ट होउ शकतात. कारण या खात्यांना आता आधारसारखे नंबर मिळाले आहेत. त्यांना युनिव्हर्सल अकाऊंट नंबर म्हटले जाते.

एवढी सर्व सुविधा झाली म्हणजे ती सर्व गुंतवणूकदारांपर्यंत पोहचली, असे मात्र म्हणता येणार नाही. कारण अजूनही अशी मोठी रक्कम अशा खात्यांत पडून आहे. मग अशा रकमेचे नेमके काय होते? सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी, राष्ट्रीय बचत पत्रे आणि ज्येष्ठ नागरिक बचत योजनांमध्ये अशी सात वर्षे पडून राहिलेली रक्कम सिनियर सिटीझन वेल्फेअर फंडात जमा केली जाते. अर्थात, हा पैसा ज्यांचा आहे त्यांना शोधण्याचा प्रयत्न संबंधित संस्थांनी करावा असा नियम आहे. त्यासाठी या संस्था प्रत्येक आर्थिक वर्षांत ३० सप्टेंबरपासून पुढील साठ दिवसांत गुंतवणूकदारांशी संपर्क साधतात. असे सतत सात वर्षे गुंतवणूकदाराशी संपर्क न झाल्यास मात्र हा निधी सिनियर सिटीझन वेल्फेअर फंडात जमा केला जातो. अशा सर्व गुंतवणूकदारांची यादी संबंधित संस्थांच्या वेबसाईटवर अपडेट करावी, असाही नियम आता करण्यात आला आहे. यातील अनेक गुंतवणुकीचा शोध नाव आणि पॅनकार्ड टाकून मिळू शकतो.

खरा प्रश्न असा आहे की, एवढी मोठी रक्कम पडून राहणे योग्य आहे का? ती पडून का राहते, त्याची कारणे आपण सुरुवातीला पाहिली आहेत. त्यावरून भारतीय गुंतवणूकदारांनी आर्थिकदृष्ट्या अधिक साक्षर होण्याची गरज आहे. गुंतवणूक करताना सर्व खरी माहिती देणे, शक्यतो डिजिटल मार्गाने गुंतवणूक करणे, त्याविषयीची कागदपत्रे जपून ठेवणे, सर्व गुंतवणुकीची एकत्र माहिती एका डायरीत लिहून ठेवणे (आवश्यक तेथे पासवर्डसह), सर्व गुंतवणुकीला वारसदाराचे नाव लावणे, वर्षातून एकदा आपल्या गुंतवणुकीचा आढावा घेणे, साठीनंतर आपले मृत्युपत्र तयार करून ठेवणे, वय वाढत जाते तसतशी गुंतवणुकीत अधिक सोपेपणा आणणे आणि कुटुंबातील किमान एका सदस्याला याची सर्व माहिती देत राहणे, एवढे जर केले गेले तर ज्या कारणासाठी गुंतवणूक केली गेली आहे, ती सार्थकी लागेल.

---

# गुंतवणूक जीवन विम्यापेक्षा वेगळी का आहे?

**जानेवारीपासून अनेक जण करबचतीचा विचार करतात आणि त्यासाठी जीवनविमा काढतात. त्यातून करबचत होत असली तरी दीर्घकाळ विमा हप्ता भरण्याची बांधिलकी घेतली जाते. ज्या जीवनविम्यातून पुरेसा परतावा मिळत नाही त्याला गुंतवणूक म्हटले जाते, पण गुंतवणूक ही जीवनविम्यापेक्षा वेगळी आहे आणि ते याच काळात समजून घेतले पाहिजे.**



**प्रसाद ल. भावे**
sharpadvisers@gmail.com

जानेवारी महिना म्हटला की, पहिला आठवडा हा शुभेच्छा व नव्या वर्षासाठीचे संकल्प वजा निर्धार करण्यात जातो. त्यासाठी निरनिराळ्या प्रकारच्या आकर्षक व महागड्या दैनंदिनी अथवा रोजनिशी घेण्यात अनेकजण वाढीव उत्सुकता दाखवतात. तशीच उत्सुकता नव्या वर्षातील आर्थिक अर्थसंकल्प म्हणजेच वैयक्तिक अथवा आपल्या कुटुंबासाठीचं एक गुंतवणूक बजेट पक्कं करावयास हवं जेणेकरून आपलीच आर्थिक उद्दिष्टं गाठण्यासाठी ते उपयोगी ठरेल. नोकरवर्गाची या महिन्यात लगबग सुरू होते ती म्हणजे आपल्या कंपनीस आपली गुंतवणूक माहिती देण्यासाठी तर काही जणांसाठी हे शेवटचे तीन महिने असतात आपल्या करबचतीचं उद्दिष्टं पूर्ण करण्यासाठी. आजच्या लेखात आपण काही खास प्रमुख करबचत गुंतवणूक पर्याय व त्यातील 'वैशिष्ट्यं' पाहू.

नव्याची नवलाई झाल्यावर आता हळूहळू करबचतीसाठी पर्याय धुंडाळले जातील, परंतु संक्रांतीस जसं सूर्याचं संक्रमण होतं, तसा आजचा हा लेख वाचून येणारा १४ जानेवारीचा दिवस सर्व गुंतवणूकदारांच्या विचारांसाठी नक्कीच एक संक्रमण ठरू शकेल.

अनेक इन्शुरन्स कंपन्या विविध आकर्षक नावाखाली अनेक प्रकारच्या योजना आणत असतात व गुंतवणूकीचा गंध नसलेले तरुण व इन्व्हेस्टमेंटचा इसेन्स (खरी चव) न चाखलेले प्रौढदेखील या स्कीम्सच्या मायाजालात अलगद ओढले जातात. त्याचा अतिरेक इतका पहावयास मिळतो की, माझ्या अशीलांना त्यांच्या गुंतवणुकीबद्दल विचारल्यावर एलआयसी आहे ना आमची, असं उत्तर येतं. माझी हरकत या योजनांना नाहीय परंतु 'इन्शुरन्स म्हणजे गुंतवणूक नव्हे' हे लक्षात घेऊन सुद्धा विविध क्लुप्त्यांद्वारे अनेक सल्लागार (मातब्बर एजंट्स) गॅरेंटीड रिटर्न्सच्या नावाखाली जणू अशा योजना आपल्या गळी उतरवू पहात असतात. याचं कारण त्यांनादेखील (याद्वारे) त्यांचं रिटायरमेंट प्लॅनिंग करायचं असतं आणि म्हणूनच तुमच्या टॅक्सप्लॅनिंगची सर्वांत चिंता कोणास असेल तर ती व्यक्ती म्हणजे अशा इन्शुरन्स कंपन्यांचे एजंट्स. कारण अशा एका स्कीममध्ये तुम्ही गुंतवणूक केल्यास सुमारे २०–३० टक्के कमिशन मिळणार असतं. एक व्यावसायिक गुंतवणूक सल्लागार कधीच अशा ट्रॅडिशनल प्लॅन्समध्ये गुंतवणूक करायला

## INSURANCE VS INVESTMENT

तुम्हांस भाग पाडणार नाही, जरी त्याला त्यातून ढीगानं कमिशन मिळत असेल कारण त्याला तुम्हाला जास्त फायदा करून देण्यात जास्त इंटरेस्ट असतो आणि हाच फरक असतो इन्शुरन्स एजंट व एक विश्वासू गुंतवणूक सल्लागार या मधला. त्यामुळं तुमचा विमा असावा ही तुमच्याबद्दलची त्यांची सजग काळजी नसून त्यांच्या स्वतःचं फायनॅन्शिअल प्लॅनिंग आहे हे वाचकांनी लक्षात घ्यावं. अनेकदा टॅक्स कन्सल्टंट्स, चार्टर्ड अकाऊंटस अथवा नात्यातील कोणीतरी हे एजंट्स असतात आणि आपल्याला अलगद जाळ्यात ओढतात. अनेक इन्शुरन्स कंपन्या जानेवारी, फेब्रुवारी व मार्च (जेएफएम)साठी आपल्या एजंट्सकरिता अनेक योजना जाहीर करतात. ज्यामध्ये त्यांना अमूक एक रक्कम इन्शुरन्स प्रीमियम गोळा केल्यावर भरगच्च इन्सेन्टिव्ह मिळणार असतो. ज्याची रक्कम लाखांमध्ये असते अथवा सिंगापूरसारख्या टुरिस्ट डेस्टिनेशनच्या मोफत टूरचीदेखील घोषणा केली जाते आणि मग असे एजंट्स आपल्यासारख्या भोळ्या लोकांना टार्गेट बनवून आपलं उखळ पांढरं करून घेतात. म्हणूनच विमा करताना आपली नेमकी गरज जाणूनच विमा उतरावा. जसा की प्युअर टर्म प्लॅन, आरोग्यविमा, वाहनविमा, घर विमा इत्यादी. त्याचप्रमाणं आयुर्विमा व गुंतवणूक ह्या दोन वेगळ्या गोष्टी असून त्यांना त्याच प्रकारे हाताळावं. अनेकदा सांगितलं जातं की, पहिले अमूक एक वर्षच विम्याचा हफ्ता भरावा आणि नंतर मरेपर्यंत विमा राहील, वारंवार जरी ही गोष्ट मोहक भासली तरी पहिल्या ठराविक वर्षांमध्ये विमा कंपनीनं तुमच्या संपूर्ण हयातीचे प्रीमियम वसूल केलेलेच असतात आणि त्याच बदल्यात तुम्हाला आजीवन विमा दिला जातो. ह्या गोष्टीची पडताळणी करण्यासाठी तुम्ही केवळ ६० वर्षांपर्यंत रेग्युलर आयुर्विमा योजनेचा प्रिमिअम किती आहे ते चेक करा आणि नंतर, ६० वर्षांपर्यंत प्रीमियम भरून नंतर आजीवन आयुर्विमा देत असलेल्या स्कीमचा प्रीमियम यांतील फरक तपासा.

**आता अशा ट्रॅडिशनल इन्शुरन्स योजनेमध्ये गुंतवणूक करण्यासाठी अथवा न करण्यासाठीची ठोस कारणे अशी–**

१) एजंट कमिशन खूप जास्त असतं आणि ते तुमच्या गुंतवणूकीतूनच दिलं जातं. साहजिकच त्याचा परिणाम परताव्यावर होतो.

२) या योजनेत कमीतकमी पाच वर्षे गुंतवणूक करत राहावी लागते म्हणजे बांधिलकी.

३) लॉक–इन कालावधी पुढील ५–१० वर्षं म्हणजे एकूण १५ वर्षे. त्यामुळं तितकी वर्ष थांबायची तयारी असल्यास कोणताही चांगला इएलएसएस फंड (इक्विटी लिंक सेव्हिंग स्कीम) त्याच्या तुलनेत उत्तम परतावा देऊ शकतो. त्यामुळं जरी १०(१०) डी चा करमुक्त परताव्याचा फायदा गृहीत धरल्यास इएलएसएस प्रकारच्या गुंतवणूकीतून निर्माण होणारी रक्कम बऱ्याच फरकानं जास्त असू शकते (अगदी दीर्घमुदत भांडवली कर विचारात घेऊन सुद्धा).

आता या योजना मुदतठेव योजना (एफडी) यांच्यापेक्षा परताव्याच्या बाबतीत नक्कीच उजव्या ठरतात, कारण पुढील पंधरा वर्षांत व्याजदर हे कमीच होत जाणार, कारण ती काळाची व अर्थव्यवस्थेची गरज ठरू शकेल आणि त्यामुळं त्या प्रमाणात बँकेतील मुदतठेवींचे व्याजदरदेखील उतरणार, परंतु या ट्रॅडिशनल योजनांचा अंतर्गत गृहीत धरलेला दर (आयआरआर) हा शेवटपर्यंत तितकाच राहील जो पॉलिसी घेताना नमूद केला असेल, त्यात बदल होणार नाही.

ज्या व्यक्तीस अजिबातच गुंतवणूक जोखीम पत्करायची नसल्यास अशा व्यक्तींसाठी कर वाचविण्यासाठी हा पर्याय बेहतर वाटू शकतो, तरी जग बुडण्याची भिती असतेच!

उदाहरणादाखल आपण इन्शुरन्स कंपनी कशी कार्य करते ते जाणून घेऊ.

एका नामवंत इन्शुरन्स कंपनीच्या नुकत्याच लाँच केल्या गेलेल्या एका आजीवन योजनेत एक तीस वर्षांची व्यक्ती दरवर्षी एक लाख रुपये, असे पुढील १० वर्षे गुंतवणूक करते. त्यानंतर त्यापुढील पाच वर्षे वेटिंग पिरियड, म्हणजे एकूण १५ वर्षे लॉक–इन. कोणत्याही वर्षी पॉलिसीधारकाची मयत झाल्यास १० लाखांचे विमाकवच. मग पंधराव्या वर्षी १.५ लाख रुपये मिळणार व पुढील ५४ वर्षे म्हणजेच त्या ३० वर्षीय व्यक्तीच्या त्याच्या वयाच्या ९९ वर्षांपर्यंत दरवर्षी १.१५ लाख रुपये मिळणार व ९९व्या वर्षी म्हणजे योजना संपताना पुन्हा १३ लाख रुपये मिळणार, म्हणजे एकूण भरणा रक्कम केवळ १० लाख व एकूण परतावा रक्कम ७६.६० लाख रुपये. वरवर पाहता ही योजना 'लई भारीच' वाटते आणि तशीच भासवली जाते, परंतु वरीलप्रकारे भरणा केल्यास व वर उल्लेखलेले सर्वच्यासर्व पे–आऊट्स व आयुर्विमा देऊनसुद्धा योजनेशेवटी त्यापेक्षा भरपूर जास्त म्हणजे तब्बल एक कोटी ९१ लाख रुपये परतावा मिळू शकतो, असं म्हटल्यावर एकतर लोक मला मूर्खात काढतील किंवा माझा पत्ता शोधत माझ्याकडं येतील, परंतु हे खरंच अगदी सहज शक्य आहे.

पहिली पंधरा वर्षे दरवर्षी ९५ हजार (एक लाख वजा रुपये ५००० – हा १० लाख आयुर्विम्यासाठीचा प्रतिवर्षीचा प्रीमियम) ही रक्कम दरवर्षी केवळ १२ टक्के परतावा देईल असं गृहीत धरल्यास दहा वर्षांत ती रक्कम होते १८.६७ लाख रुपयांनंतर ती रक्कम दरवर्षी ५००० रुपये वगळून पुढील पाच वर्षांसाठी केवळ आठ टक्के परतावा देणाऱ्या इंडेक्स फंड किंवा इक्विटी लिंक सेव्हिंग स्कीममध्ये गुंतवल्यास पुढील पाच वर्षांत ती रक्कम होते. २७.१८ लाख रुपये. आता दरवर्षी १.१५ लाख रुपयं पे–आऊट व ५००० रुपये विमा हफ्ता असे १.२० लाख वगळत उरलेली रक्कम केवळ १२ टक्के परताव्याच्या योजनेत पुढील ५४ वर्षे गुंतवणूक चालू ठेवल्यास वयाच्या ६०व्या वर्षीच (३० वय + १५ वर्षे लॉकइननंतर १५ वर्षांनी) ही रक्कम एक कोटी रुपयांचा टप्पा गाठते. तर ९९व्या वर्षी ही रक्कम होते ४४ कोटी ६७ लाख ५१ हजार ५९९ रुपये.

यामध्ये कोठेही अवास्तव परतावा गृहीत धरलेला नाहीय. अगदी सेन्सेक्सनं मागील ४० वर्षांत दिलेला परतावा (दरवर्षी १७ टक्के) गृहीत धरल्यास १९१ कोटी रुपये होईल! आता विचार करा, उत्तम वेल्थ मॅनेजर किंवा उत्तम वित्तव्यवस्थापक हाताशी असल्यास केवळ एका योजनेद्वारे इन्शुरन्स कंपन्या किती नफा कमावू शकतात, म्हणून इन्शुरन्स योजनेत गुंतवणूक म्हणजे आपल्या स्वतःच्या फायद्यापेक्षा इन्शुरन्स कंपनीच्याच नफ्याचं प्लॅनिंग होत असतं व स्वतःपेक्षा जास्त त्यांच्याच नफ्यासाठी आपण गुंतवणूक करत असतो. अर्थातच, अनेक जण यावर विचार न करता सर्व सूत्र कोणा नावाजलेल्या कंपन्यांच्या हातात देऊ पाहतात त्यांना लखलाभ.अशा गुंतवणूकदारांसाठी अशा कंपन्यांकडं लाल गालिचा नेहमीच अंथरलेला असतो यात दुमत नाही.

**अस्वीकृती : वरील लेख हा कोणासही कोणत्याही योजनेत गुंतवणूक करण्यास प्रवृत्त अथवा कोणत्याही योजनेपासून परावृत्त करण्याच्या हेतूनं लिहिलेला नाही, फक्त गुंतवणूकदारांना जागरूक करण्याचा प्रयत्न आहे.**



---

## अर्थसाक्षर स्पर्धा : २

### निकाल पुढील प्रमाणे

**प्रश्न क्र. १ पुढीलपैकी कोणती एकबँक सार्वजनिक क्षेत्रातील आहे म्हणजे सरकारी आहे?**
**उत्तर : *ड.)*** *इंडिया ओव्हरसीज बँक*

**प्रश्न क्र. २ डिसेंबरच्या अखेरीस सेन्सेक्समध्ये समाविष्ट झालेल्या आयटी कंपनी कोणती?**
**उत्तर : *क.)*** विप्रो

**प्रश्न क्र. ३ शेअर बाजाराच्या निफ्टी इंडेक्समध्ये किती कंपन्यांचा समावेश आहे?**
**उत्तर : *क.)*** ५०

अर्थसाक्षर स्पर्धा २ची बरोबर उत्तरे : आलेल्या सर्व उत्तरांपैकी केवळ एकाच स्पर्धकाचे उत्तर बरोबर आले असून त्या विजेत्या स्पर्धकाचे नाव **'रंजना ओब्लेप्पा निरहोली'** असे आहे. या स्पर्धकाला 'ई–स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येत आहे. त्यांनी सदर व्हाऊचर्स दुपारी २ ते ६ या वेळेत दैनिक राम प्रहरच्या कार्यालयातून घेऊन जावे. त्यांचे अभिनंदन!

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणत्या सरकारी तेल कंपनीचे बाजारमूल्य सर्वांत अधिक आहे?**
***अ.)*** इंडियन ऑईल ***ब.)*** बीपीसीएल ***क.)*** ओएनजीसी ***ड.)*** एचपीसीएल

**२. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक असलेल्या डीमॅट खात्यांची संख्या भारतात सध्या एवढी झाली आहे.**
***अ.)*** ४.३ कोटी ***ब.)*** ५.५ कोटी ***क.)*** १० कोटी ***ड.)*** ७.४ कोटी

**३. अप्रत्यक्ष कर असलेल्या गुड ॲण्ड सर्विस टॅक्स (जीएसटी) ची आतापर्यंतची सर्वाधिक मासिक वसुली एवढी झाली आहे.**
***अ.)*** १.१९ लाख कोटी रुपये ***ब.)*** १.४५ लाख कोटी रुपये
***क.)*** १.३९ लाख कोटी रुपये ***ड.)*** १.१० लाख कोटी रुपये

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF



**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई–स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा.**

# पालीची अंबा नदी प्रदूषणाच्या विळख्यात

## नागरिक व प्राण्यांचे आरोग्य धोक्यात



(छाया : धम्मशील सावंत)

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्याची जीवनवाहिनी असलेल्या अंबा नदीला प्रदूषण आणि घाणीने वेढले आहे. नदीच्या पाण्यावर तवंग व शेवाळ आले आहे. सांडपाणी, कचरा, वाळू उपसा यामुळे नदीचे पाणी दुषीत झाले असून, त्यामुळे नागरिक व प्राण्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

अंबा नदीतून पाली शहराला पाणीपुरवठा होतो. तसेच या नदी काठच्या गावांतील लोक व प्राणीदेखील याच पाण्याचा पिण्यासाठी वापर करतात. पावसाळ्यानंतर अनेक ठिकाणी बंधारे बांधून अंबा नदिचे पाणी अडविले जाते. या साठलेल्या पाण्यात सध्या मोठ्या प्रमाणात हिरवळ तयार झाली आहे. तसेच वाहून आलेले सांडपाणी येथेच साठून राहते. अनेक कपंन्यांमधून रासायनिक सांडपाणी थेट आंबा नदीत सोडले जाते. या सांडपाण्याबरोबरच कचरा आणि घाणदेखील साठते. नदीवर महिला कपडे व भांडी धुतात. तसेच नदीत टाकलेले निर्माल्य कुजल्याने पाणी खराब होते. त्यामुळे पाण्याला उग्र स्वरुपाची दुर्गंध येते, चवही खराब लागते. पाणी प्रदुषित झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.

**अंबा नदीचे पाणी दूषित झाले आहे. नदी किनारी असलेल्या सर्व कंपन्यांना नोटीस पाठवलेली आहे. तसेच गटविकास अधिकाऱ्यांसोबत या संदर्भात बैठक आयोजित केली आहे. नागरिकांनी पाणी उकळून व गाळून प्यावे.**

**–दिलीप रायण्णावार, तहसीलदार, पाली–सुधागड**

# पावती फाडा, कुठेही टपरी उभी करा!

## खोपोली नगरपालिकेचा अनागोंदी कारभार



(छाया : विनायक माडपे)

**खोपोली : प्रतिनिधी**

येथील नगरपालिका हद्दीतील अनेक मोकळ्या जागांवर मोठ्या प्रमाणात व्यवसायासाठी अनधिकृत टपऱ्या उभारल्या जात आहेत. या व्यावसायिकांकडून रोज २० ते २५ रुपयांची पावती फाडण्यात येते. त्यामुळे शहरात अनेक ठिकाणी बाहेरचे अनेक व्यापारी अघोषित योजनांचा फायदा घेताना दिसून येत आहेत.

शहरातील खालची खोपोली ते पेपको गेट ते स्मशानभूमीपर्यंतच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोकळ्या जागेत पूर्वी फक्त गुरुवारच्या बाजारात बाहेरचे व्यापारी तात्पुरती बांबूची टपरी उभारून व्यवसाय करीत होते. मात्र आता वीस रुपयांची पावती फाडून या व्यापाऱ्यांनी रोजच्या व्यवसायासाठी बांबूच्या टपऱ्या उभारल्या आहेत. खोपोली नगरपालिका प्रशासन त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा स्थानिक व्यापारी व रहिवाशांचा आरोप आहे. अगोदरच करोनामुळे येथील बाजार मंदावला त्यात मुंबईकडील व्यापारी येवून अशाप्रकारे व्यवसाय करीत असतील तर, येथील स्थानिक व्यापारी रस्त्यावर येईल, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

खोपोली शहरात वासरं पुलावर नदीच्या काठी अलीकडे व्यापारी गाळे बांधण्यात आले आहेत. तसेच शिळफाटा डीपी रोडवरही अनेक गाळे दिसून येत आहेत. पालिका अधिकाऱ्यांनी नवीन होणाऱ्या बांधकामाकडे जास्त लक्ष केंद्रित केल्याचे बोलले जात आहे. पण शहराला बकाल करणाऱ्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकामाकडे संबंधित खात्याचे दुर्लक्ष करीत असल्याबद्दल कर भरणाऱ्या नागरिकांनी तिखट प्रतिक्रिया दिल्या आहेत.

यासंदर्भात खोपोली नगरपालिकेचे मुख्याधिकारी तसेच अतिक्रमण विरोधी विभागाशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

# माथेरानमध्ये भाजपतर्फे आधार कार्ड दुरुस्ती शिबिर

**माथेरान : प्रतिनिधी, बातमीदार**

भारतीय जनता पक्षाच्या माथेरान मंडलाच्या वतीने शनिवार (दि. ८) बोहरा समाज सभागृहात आधार कार्ड दुरुस्ती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला.

यावेळी माजी नगरसेवक प्रदिप घावरे, चंद्रकांत जाधव, राकेश चौधरी, नगरसेविका प्रियांका कदम, रुपाली आखाडे, भाजपचे माजी अध्यक्ष विलास पाटील, अरविंद शेलार, सुनील शिंदे, मनीषा पाटील, मनोहर रांजणे, रजनी कदम, तुषार जांभळे, बाबू बर्गे, सुभाष भोसले, संजय भोसले, माजी नगरसेवक गजानन अबनावे, आंबो चौधरी, अमोल चौगुले यांच्यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.



# खालापूर तहसीलदार कार्यालयात कोविड-१९ कॉल सेंटर सुरू




(छाया : विनायक माडपे)

**खालापूर : प्रतिनिधी**

सद्य:परिस्थितीमध्ये कोरोनाचा प्रादूर्भाव सर्वत्र वाढत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी जिल्ह्यात तातडीने उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी सर्व तहसील कार्यालयांमध्ये कोविड–१९ कॉल सेंटर सुरू करण्याच्या सर्व तहसीलदारांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार खालापूर तहसीलदार कार्यालय येथे कोविड–१९ कॉल सेंटर सुरू करण्यात आले आहे.

नागरिक ०२१९२–२७५००१ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून कोविड–१९, बेड व्यवस्थापन, ॲम्बुलन्स तसेच अन्य वैद्यकीय सुविधा याबाबतची माहिती विचारू शकतात. वैद्यकीय मदत व मार्गदर्शन मिळवू शकतात, अशी माहिती खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांनी दिली.

नागरिकांनी घाबरून न जाता लसीकरण करून घ्यावे, मास्क वापरावा, सोशल डिस्टन्सिंगचे पालन करावे, सॅनिटायझरचा वापर करावा, कोविड अनुरूप वर्तनाचे काटेकोर पालन करावे, कोणताही त्रास होत असल्यास तात्काळ वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन आहे.

# दोन डोस घेतले नसल्यास माणगाव शासकीय कार्यालयात प्रवेश नाही!

**माणगाव : प्रतिनिधी**

ओमायक्रॉनचा वाढता प्रादुर्भाव आणि झपाट्याने वाढणारी रुग्णसंख्या विचारात घेत कोविड लसीकरणाचे दोन डोस घेतल्याचे प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला माणगाव तालुक्यातील कुठल्याही शासकीय कार्यालयात प्रवेश दिला जाणार नाही, अशी माहिती तहसीलदार प्रियांका आयरे कांबळे यांनी शुक्रवारी (दि. ७) प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

सर्व नागरिकांनी मास्कचा काटेकोरपणे वापर करणे आवश्यक आहे. विनामास्क फिरणाऱ्यांवर माणगाव पंचायत समिती व नगरपंचायतीमार्फत दंडात्मक कारवाई करण्यात येईल. कोविड पॉझिटिव्ह रुग्णांसाठी तहसील कार्यालयात कंट्रोल रूम स्थापन करण्यात आली असून सीसीटिव्ही रुग्णवाहिका, बेड, ऑक्सीजन व व्हेंटिलेटर सुविधा तसेच कोविड रुग्णांचे समुपदेशन या माध्यमातून करण्यात येणार असल्याचेही तहसीलदारांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

सर्व नागरिकांनी कोविडविषयक नियमांचे गांभीर्यपूर्वक पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही तहसीलदार प्रियांका आयरे कांबळे यांनी या प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# पेणमध्ये महिलांच्या विविध स्पर्धा

**पेण : प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून पेणमध्ये महिला स्वयंम सहाय्यता बचत गटाच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या वेळी पोलीस उपनिरीक्षक मीनल शिंदे यांनी महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन केले.

या वेळी कोरोनाचे नियम पाळून संगीत खुर्ची, बॉल इन बकेट, चित्राला टिकली लावणे, चमचा लिंबू, रनिंग अशा विविध खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात बचत गटाच्या महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. त्यामुळे रंगत दिसून आली.

बक्षीस समारंभ कार्यक्रमात मीनल शिंदे यांनी महिलांना आपले हक्क आणि ताकदीची जाणीव करून दिली. या कार्यक्रमास माविमच्या किरण म्हात्रे, अहिल्या मंडळाच्या अश्विनी गाडगीळ, ॲड. तेजस्विनी नेने, माजी नगरसेविका प्रतिभा जाधव, बचत गटाच्या अध्यक्षा मुस्कान झटाम आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

माविमच्या सीआरपी दीपाली साळवी, प्रीती भोइर, संजीवनी वस्ती व बचत गटाच्या सर्व महिलांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.



(छाया : अनिस मनियार)

# खोपोली–कर्जत फाटा मार्गावर गतिरोधक उभारावेत



(छाया : अरूण नलावडे)

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली–पळसदरी–कर्जत फाटा मार्गावरील नावंढे थांबा, केळवली स्टेशन, डोळवली, माणकीवलीफाटा, अंजरुण गाव थांबा येथे गतिरोधक उभारावेत, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते जगदिश आगिवले यांनी खालापूर तहसीलदार व पोलीस निरीक्षकांकडे शुक्रवारी (दि. ७) निवेदनाद्वारे केली.

एमएमआरडीएच्या माध्यमातून खोपोली हाळफाटा मार्गे कर्जत फाटा या मार्गाचे रुंदीकरण व काँक्रिटीकरणाचे काम अंतीम टप्प्यात आहे. या मार्गावर वाहनांची तसेच विद्यार्थी, महिला, चाकरमानी व प्रवाशांची सतत वर्दळ असते. काँक्रिटीकरण झाल्यामुळे या मार्गावरून वेगाने वाहने धावत असतात. या मार्गावरील वर्दळीच्या ठिकाणी गतिरोधक व झेब्रा क्रॉसिंग नसल्याने चालकांना आपल्या वाहनावर नियंत्रण ठेवता येत नाही. व पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना कसरत करावी लागते. त्यामुळे सातत्याने छोटे–मोठे अपघात होत असतात. पादचाऱ्यांची सुरक्षा आणि अपघात टाळण्यासाठी या मार्गावरील अपघातप्रवण क्षेत्र असलेल्या नावंढे थांबा, केळवली स्टेशन, डोळवली, माणकिवली फाटा, अंजरुण गाव थांबा येथे संबंधित ठेकेदारांने लवकरात लवकर गतिरोधक उभारावेत, असे आगिवले यांनी निवेदनात म्हटले आहे. त्यांनी हे निवेदन शुक्रवारी खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी व पोलीस निरीक्षक अनिल विभूते यांना दिले. यावेळी माणकीवली उपसरपंच विकास रसाळ, नावंढे ग्रामपंचायत सदस्य श्रीकांत हाडप, सामाजिक कार्यकर्ते अशोक पिंगळे, समाधान दिसले आदी उपस्थित होते.

**खोपोली हाळफाटा मार्गे कर्जत फाटा या मार्गावर दिवसेंदिवस वाहनांची वर्दळ वाढू लागली आहे. ग्रामस्थांचा प्रवास सुरक्षित व्हावा, यासाठी या मार्गावर तातडीने गतीरोधक टाकणे गरजेचे आहे, अन्यथा अपघातात काही निष्पापांचा बळी जाऊ शकतो.**

**–विकास रसाळ, उपसरपंच, माणकिवली, ता. खालापूर**

# पालीत कचऱ्याची समस्या गंभीर

## प्लास्टिक खाणाऱ्या गुरांचा जीव धोक्यात

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्याचे मुख्यालय पालीत कचऱ्याची समस्या गंभीर झाली आहे. नगरपंचायतीच्या घंटागाड्या फिरूनदेखील काही नागरिक रस्त्यावर आणि फुटक्या कचराकुंड्यामध्ये कचरा टाकत आहेत. परिणामी पालीमध्ये कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. हा कचरा नागरिकांच्या आरोग्यास अपायकारक ठरत आहे, तर कचराकुंडीत काही खाद्य मिळेल यासाठी गुरे कचऱ्यातील प्लास्टिक पिशव्या खात आहेत. या गुरांच्या जीवितासही धोका निर्माण झालाय. सांडपाण्याचा निचरादेखील योग्य पद्धतीने होत नसल्याची ओरड नागरिक करीत आहेत.

पालीतील कचरा समस्येवर मात करण्यासाठी तत्कालीन ग्रामपंचायतीतर्फे चार वर्षांपूर्वी घंटागाड्या सुरू करण्यात आल्या होत्या. या घंटागाड्या येथील विविध भागात फिरून कचरा गोळा करतात. फक्त रविवारीच घंटागाड्या येत नाहीत. त्यानंतर सोमवारी अनेक ठिकाणच्या कचराकुंड्या व रस्त्याच्या कडेला कचऱ्याचा ढीग पडलेला असतो. तर घंटागाडी कचरा घेऊन गेल्यानंतर झालेला कचरा काही दुकानदार तसेच अनेक नागरिक घरात किंवा सोसायटीमध्ये साठवून न ठेवता लागलीच कचरा कुंड्यांमध्ये व रस्त्यावर टाकतात. गुरे–ढोरे व भटके कुत्रे यातून अन्न शोधण्यासाठी जातात आणि हा सर्व कचरा रस्त्यावर व बाजुच्या गटारात पडतो. आणि गटारे तुंबून समस्या उद्भवते.





## नागरिकांच्या आरोग्याची हानी

**पालीत घंटागाडी नियमित फिरत असूनसुद्धा काही नागरिक नादुरुस्त कचराकुंड्यामध्ये व रस्त्यावर कचरा टाकतात. नगरपंचायतीने नागरिकांना घंटागाडीचा वापर करण्यासाठी जनजागृती व नियोजन करावे. तसेच डम्पिंग ग्राऊंडसुद्धा बंदिस्त असावे.**

**–शरद गोळे, सामाजिक कार्यकर्ता, पाली**

**नजीकच्या काळात पालीतील सर्व कचराकुंड्या बंद करणार आहोत. त्यामुळे नागरिकांनी घंटागाडीमध्येच कचरा टाकावा. कचराकुंडीत कचरा टाकला तरी तो बाहेर पडू देऊ नये. नागरिकांनी शिस्त पाळण्याची आवश्यकता आहे. जेणेकरून गाव स्वच्छ व सुंदर राहील. नागरिकांनीही योग्य कचरा व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. त्यांनी स्वच्छतेसाठी सर्वोतोपरी सहकार्य करावे.**

**–दिलीप रायण्णावार, प्रशासक, पाली नगरपंचायत**

### *अपुरे सफाई कर्मचारी*

*पाली नगरपंचायतीकडे अधिकृत १५ ते १८ सफाई कर्मचारी आहेत. मात्र तुटपूंजा पगार व सुविधांचा अभाव यामुळे प्रत्यक्षात जेमतेम ९–१० कर्मचारी रोज कामावर येतात. त्यामुळे त्यांच्यावर अतिरिक्त कामाचा ताण येतो. परिणामी सर्वच ठिकाणची साफसफाई करणे त्यांना शक्य होत नाही.*

### *आणखी घंटागाड्या हव्यात*

*पालीमधील कचरा उचलण्यासाठी सध्या एक ट्रॅक्टर व दोन छोटाहत्ती घंटागाड्या व एक ॲपे आहेत. यातील एक घंटागाडी छोटी व बंदिस्थ आहे. त्यामुळे तिच्यात अधिक कचरा सामावत नाही. तसेच पालीचा विस्तार वाढत असल्याने अधिकच्या घंटागाड्यांची आवश्यकता आहे.*

# महाड येथील नेत्रचिकित्सा केंद्राचे लोकार्पण

**महाड : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील सुप्रसिध्द नेत्रतज्ज्ञ डॉ. सुहास हळदीपूरकर यांच्या लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट आणि लायन्स क्लब ऑफ महाडच्या माध्यमातून महाडमध्ये सुरु करण्यात आलेल्या नेत्रचिकित्सा केंद्राचे लोकार्पण शुकवारी (दि. ७) लायन्स क्लबचे डिस्ट्रीक्ट फस्ट व्हाईस गव्हर्नर मुकेश तनेजा आणि अण्णासाहेब सावंत अर्बन बँकेच्या अध्यक्षा शोभाताई सावंत यांच्या हस्ते करण्यात आले.

लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टचे नानक राजानी, डॉ. गौतम पवार, डॉ. चंद्रशेखर दाभाडकर, डॉ. सुजाता दाभाडकर, लायन्स क्लब ऑफ महाडचे अध्यक्ष रोशन गुजर, कैलास जंगम, गिरीश पयेलकर, बाबुलाल जैन, दीपक शेठ, अनंत सुकले आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी या केंद्रावर ५९ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली.

या नेत्रचिकित्सा केंद्रावर रोज सकाळी ९ ते सायंकाळी ५ यावेळेत अत्यंत माफक दरामध्ये संपूर्ण नेत्र तपासण्या करण्यात येतील. तसेच माफक दरामध्ये चष्मेसुद्धा उपलब्ध होणार आहेत. परिसरातील रुग्णांनी या नेत्रचिकित्सा केंद्राचा उपयोग करून घ्यावा, असे आवाहन लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे करण्यात आले आहे.



## राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

# भारत पेट्रोलियम, शिवशक्ती संघ विजेते





**पाचगणी : प्रतिनिधी**

भारत पेट्रोलियम आणि शिवशक्ती यांनी पाचगणी व्यायाम मंडळ आयोजित अनुक्रमे पुरुष व्यावसायिक आणि महिला गटात अजिंक्यपद पटकाविले. सर्वोत्तम खेळाडू पुरुषांमध्ये भारत पेट्रोलियमचा अजिंक्य पवार आणि महिलांमध्ये शिवशक्तीची रेखा सावंत ठरली.

पाचगणी येथील बाळासाहेब भिलारे क्रीडानगरीत झालेल्या व्यावसायिक पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात भारत पेट्रोलिमने मुंबई बंदरचा दुबळा प्रतिकार ३४-०९ असा संपवित भाऊसाहेब भिलारे चषकावर नाव कोरले. पूर्वार्धातच अजिंक्य पवार याच्या तुफानी चढायांच्या जोरावर पेट्रोलियम संघाने दोन लोण चढवित २४-०४ अशी भक्कम आघाडी घेतली. उत्तरार्धात तोच जोश कायम ठेवत २३ गुणांनी सामना आपल्या खिशात टाकला. अजिंक्यला या विजयात अक्षय सोनी याची चढाईत, तर निलेश शिंदे, ओमकार शिंदे यांची पकडीची भक्कम साथ लाभली. मुंबई बंदराला दोन आकडी गुणसंख्याही गाठता आली नाही. साखळी व बाद फेरीच्या सामन्यात दमदार खेळ करीत अंतिम फेरी गाठणारा मुंबई बंदरचा संघ अंतिम सामन्यात मात्र अगदीच दुबळा ठरला. त्यांच्या ज्ञानेश जाधव, किरण मगर यांची डाळ शिजली नाही.

महिलांच्या अंतिम सामन्यात मुंबईच्या शिवशक्तीने उपनगरच्या स्वराज्य मंडळाला ३०-१७ असे रोखत विजेतेपद आपल्या नावे केले. शिवशक्तीने सुरुवात आक्रमक करीत स्वराज्यवर लोण देत पहिल्या डावांत १६-०८ अशी आघाडी घेतली. दुसऱ्या डावातदेखील शिवशक्तीने चार खेळाडू उरले असताना रेखा सावंतने एका चढाईत तीन गडी टिपत स्वराज्यवर आणखी एक लोण देत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. रेखाला चढाईत अक्षता पाटील हिची, तर पकडीत साक्षी रहाटे, प्राची भादवणकर यांची उत्कृष्ट साथ लाभली. स्वराज्यकडून सायली नागवेकर, याशिका पुजारी उत्कृष्ट खेळल्या, पण त्यांना एकाही लोणची परतफेड करता आली नाही.

## तिसऱ्या कसोटीसाठी सिराजच्या उपलब्धतेवर प्रश्नचिन्ह

**जोहान्सबर्ग : वृत्तसंस्था**



भारताला आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत पराभव पत्करावा लागला. सामन्यादरम्यान भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज स्नायूंच्या दुखापतीमुळे जायबंदी झाला. आता तिसरी आणि अखेरची कसोटी केपटाऊनला खेळवण्यात येणार असतानाच सिराजच्या उपलब्धतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

सिराज सध्या पूर्णपणे फिट नाही. त्याच्या दुखापतीबद्दल वैद्यकीय टीम लक्ष ठेवून आहे. पुढील चार दिवसांत तो फिट होईल की नाही याचा अंदाज येईल. फिजिओ त्याच्या स्नायूंच्या दुखापतीबाबत स्कॅनिंग करीत आहेत, असे सांगण्यात आले आहे. भारत वि. आफ्रिका यांच्यातील निर्णायक कसोटी ११ जानेवारीपासून खेळली जाणार आहे. या महत्त्वाच्या सामन्याला सिराज मुकल्यास अन्य गोलंदाजांवर ताण येऊ शकतो.

## आरोग्य प्रहर



### स्टेराईडचा अतिवापर ठरतो धोकादायक!

चांगले सुडौल शरीर असावे असे बहुतेकांना वाटते, पण ते मेहनतीने कमविलेले असावे. सिक्स पॅक तर युवकांना चांगलीच भुरळ घालतात. हे सारे कमी वेळात कसे मिळविता येतील यासाठी प्रयत्न सुरू होतात. त्यातून स्टेराईडसारख्या औषधांचा वापर सुरू होते, पण हा स्टेराईड काही दिवसांसाठी ठीक आहे. नेहमीसाठी याची सवय लावून घेता कामा नये. स्टेराईडच्या अतिवापराने हाडे ठिसूळ होताना दिसतात.

**पचनसंस्था का येते धोक्यात**

कमी वेळात चांगली बॉडी कमवायची आहे तर मग व्यायामशाळेत जावे लागते. त्या ठिकाणी काही वस्तू खान्यासाठी देतात. यामुळे वजन तर वाढते, पण पचनसंस्था धोक्यात येण्याची शक्यता असते. याचा वाईट परिणाम आपल्या शरिरावर होतो, अशी माहिती अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. संजीव चौधरी यांनी दिली.

**सुरुवातीला पाच मिनिटे वार्मअप करा**

व्यायामशाळेत गेल्यानंतर काही जण बेसिक व्यायामाकडे दुर्लक्ष करतात. वार्मअपकडे दुर्लक्ष केले जाते. हे शरीरासाठी धोकादायक ठरू शकतात. कोणताही व्यायाम सुरू करण्यापूर्वी किमान पाच मिनिटे वॉर्मिंग अप आणि स्ट्रेचिंग अवश्य करावे. सावकाश सुरुवात करून मगच त्यात वाढ करावी.

**जिमला जाण्यापूर्वी काय कराल**

जिमला जाण्यापूर्वी जास्त पाणी पिऊ नका. झोप पूर्ण होऊ द्या. चहा-कॉफी घेऊन जीम करू नका. शरीराला ऊर्जा देणारे पदार्थ घेऊ नये, तसेच क्षमतेपेक्षा जास्त वजन उचलू नये या अटी-शर्थींचे पालन केल्यास तुमचे आयुर्मान चांगले असेल.

## षटकांची गती राखण्यासाठी आयसीसीची गंभीर पावले

**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) ट्वेन्टी-२० आंतरराष्ट्रीय सामने निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या इराद्याने षटकांची गती योग्य राखण्यासाठी गंभीर पावले उचलली आहेत. यापुढे षटकांची गती कमी राखणाऱ्या संघांना उर्वरित डावात ३० यार्डाच्या वर्तुळाबाहेर क्षेत्ररक्षणासाठी पाचऐवजी चारच क्षेत्ररक्षक ठेवता येणार आहेत.

आयसीसीने केलेल्या नव्या नियमानुसार क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाने डावाच्या अखेरच्या षटकांतील पहिला चेंडू नियोजित किंवा सुधारित वेळेत टाकायला हवा. अन्यथा ३० यार्डाच्या वर्तुळाबाहेरील एक क्षेत्ररक्षक संघाला कमी करावा लागेल.

सध्या पहिल्या सहा षटकांच्या 'पॉवर प्ले'नंतर पाच क्षेत्ररक्षक ३० यार्डाच्या वर्तुळाबाहेर ठेवण्याची संघांना परवानगी आहे. या संदर्भात पंच क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाच्या कर्णधाराला सूचना देतील.

आतापर्यंत प्रत्येक संघाला २० षटके पूर्ण करण्यासाठी ८५ मिनिटांचा निर्धारित वेळ दिला जात होता. नव्या नियमानुसार क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाला २०वे षटक ८५व्या मिनिटाच्या आत सुरू करणे अनिवार्य असेल.

याशिवाय द्विराष्ट्रीय मालिकांमध्ये डावाच्या मध्यावर दोन्ही डावांत प्रत्येकी अडीच मिनिटांची अतिरिक्त जलपान विश्रांतीची तरतूद केली आहे.

**शेन वॉर्नचा खळबळजनक खुलासा**

## पाकिस्तानच्या कर्णधाराने दिली होती फिक्सिंगची ऑफर

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

जगातील सर्वकालिक महान लेगस्पिनर व ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू शेन वॉर्न याने १९९४मध्ये कसोटी सामन्यादरम्यान घडलेला एक धक्कादायक प्रकार त्याच्या 'शेन' या आगामी डॉक्युमेंटरीमध्ये कथन केला आहे. यामध्ये त्याने पाकिस्तानचा तत्कालीन कर्णधार सलीम मलिकवर पैशांची ऑफर दिल्याचा आरोप केला आहे.

वॉर्नने म्हटलेय की, ऑस्ट्रेलियाचा संघ १९९४ साली पाकिस्तानच्या दौऱ्यावर गेला होता. या दौऱ्यातील एका सामन्यात चौथ्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर पाकिस्तानचा कर्णधार सलीम मलिकने मला भेटायला बोलावले. त्या वेळी त्याने तुला माहिती नाही की जर आम्ही पाकिस्तानमध्ये हरलो, तर काय घडते. आमची घरे जाळली जातील. आमच्या नातेवाईकांची घरे जाळली जातील, असे सांगून खराब गोलंदाजी टाकण्यासाठी पैसे देऊ केल्याचे सांगितले. मलिकने मला आणि टीमला प्रत्येकी एक कोटी ४० लाखांची ऑफर दिली. त्याने आम्हाला वाईड ऑफ द स्टम्प्स चेंडू टाकायला सांगितले होते.



आम्ही ही ऑफर पूर्णपणे धुडकावून लावली. मला सलीमच्या बोलण्यामुळे धक्का बसला. मी म्हणालो, मला कळत नाहीये यावर काय बोलायचे. मी थोडा वेळ शांत बसलो आणि म्हणालो खड्ड्यात जा मित्रा. आम्ही तुम्हाला हरवणार आहोत. या प्रकाराविषयी मी आणि टीमने कर्णधार मार्क टेलर आणि प्रशिक्षक बॉब सिम्पसन यांना सांगितले. त्यानंतर याबाबत मॅच रेफरी जॉन रेड यांनादेखील कळवण्यात आले, असेही वॉर्नने नमूद केले आहे.

पाकिस्तानने तो सामना एका विकेटने जिंकला. सामना संपल्यानंतर आम्ही शेवटच्या कार्यक्रमासाठी उभे होतो. मी पाकिस्तानच्या संघाकडे पाहात होतो. सलीम मलिक तिथे बसला होता आणि एक विचित्र हावभाव त्याच्या चेहऱ्यावर होते. जणूकाही तो मला खुणावत होता की, तू ते पैसे घ्यायला हवे होतेस, असाही दावा वॉर्नने त्याच्या डॉक्युमेंटरीमध्ये केला आहे.

# प्रो कबड्डी लीग : जयपूरची पुण्यावर मात, तर हरयाणाकडून बंगालचा पाडाव



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

प्रो कबड्डीच्या आठव्या हंगामात शुक्रवारी झालेल्या दोन सामन्यांमध्ये जयपूर पिंक पँथर्स आणि हरयाणा स्टीलर्स यांनी बाजी मारली. जयपूरने पुण्याचा ३१-२६ असा पराभव केला, तर हरयाणा स्टीलर्सने गतविजेत्या बंगाल वॉरियर्सचा ४१-३७ असा पराभव करीत रोमांचक विजय नोंदवला.

जयपूरकडून अर्जुन देशवालने सर्वाधिक ११ गुणांची नोंद केली. तर पुण्याकडून कमकुवत बचाव पाहायला मिळाला. पलटनचे नितीन तोमर, मोहित गोयत अपेक्षेनुसार चांगली कामगिरी करू शकले नाहीत. जयपूरकडून अमित शॉल कुमार आणि संदीप कुमार धुल यांनी चांगला बचाव करीत संघांच्या विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

यासह जयपूरने सलग तीन पराभवांनंतर पहिला विजय नोंदवला आहे. आता जयपूरचा संघ सातव्या क्रमांकावर पोहचला, तर दुसरीकडे पुणेरी पलटनने सात सामन्यांत पाचवा पराभव पत्करला.

तत्पूर्वी, पहिल्या सामन्यात हरयाणा स्टीलर्सने बंगाल वॉरियर्सना नमविले. या सामन्यात पूर्वार्धात दोन्ही संघांच्या बचावपटूंची कामगिरी जबरदस्त होती. उत्तरार्धातही हरयाणाने आपली पकड कमकुवत होऊ दिली नाही. बंगालने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, परंतु विकास कंडोलाने त्याच्या चढाईत दोन गुण मिळवले आणि सामना बंगालपासून दूर नेला. शेवटी हरयाणाने सामना जिंकला. बंगाल वॉरियर्सचा कर्णधार मनिंदर सिंगने या सामन्यात सर्वाधिक १४ गुण मिळवले.

या विजयासह हरयाणाचा संघ गुणतालिकेत सहाव्या स्थानावर पोहचला आहे, तर दुसरीकडे बंगालचा संघ सातव्या स्थानावर घसरला आहे.



## कबड्डी निवड चाचणी स्पर्धा | ग्रिफिन जिमखाना, ज्ञानशक्ती युवा विजेते

**भिवंडी : प्रतिनिधी**

ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनने उजाळा क्रीडा मंडळाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या ६६व्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या कुमार गटात ग्रिफिन जिमखाना, कुमारी गटात ज्ञानशक्ती युवा, तर व्यावसायिक पुरुष गटात जॉयकुमार युवा प्रतिष्ठान यांनी जेतेपद पटकाविले.

भिवंडी वळगाव येथील स्व. जाईबाई काशिनाथ पाटील क्रीडानगरित झालेल्या कुमार गटाच्या अंतिम सामन्यात ग्रिफिन जिमखानाने जय बजरंग मंडळाचा कडवा प्रतिकार ५-५ चढायांच्या डावात ४१-३५(९-३) असा मोडून काढत विजेतेपदाच्या चषकावर आपले नाव कोरले. मोहन पुजारी, रोहन तुपारी ग्रिफिनकडून, तर निखिल



भोईर, आशिष पाटोळे जय बजरंगकडून उत्कृष्ट खेळले.

कुमारी गटाच्या अंतिम सामन्यात ज्ञानशक्ती युवाने राजर्षी शाहू महाराज संघाला ३८-२८ असे रोखत विजेतेपदाला गवसणी घातली. यतीक्षा बाबडे, निधी राजोळे, मानसी गायकर, मनीषा गायकवाड या विजयाच्या शिल्पकार ठरल्या. राजर्षी शाहूकडून साधना यादव, ज्योती विश्वकर्मा, सिमरन सोनार उत्तम खेळल्या.


यावसायिक पुरुषांच्या अंतिम सामन्यात जॉयकुमार युवा प्रतिष्ठानने प्रिन्सकुमार अॅण्ड कंपनीला ३१-१७ असे नमवित या विभागात जेतेपदाचा मुकुट हस्तगत केला. राकेश पाटील, प्रणय राजपूत, अभिषेक भोईर यांच्या चतुरस्त्र खेळाच्या बळावर विश्रांतीला १८-०९ अशी आघाडी घेतली. विश्रांतीनंतर तोच खेळ कायम राखत हा विजय मिळविला. निखिल जोशी, रोहित पाटील प्रिन्सकुमारकडून उत्तम खेळले.

## राम प्रहर अर्थसाक्षर प्रश्नमंजुषा

दैनिक राम प्रहरमध्ये दर रविवारी अर्थ प्रहर सदर प्रकाशित होते. या सदरातून वाचकांना अर्थविषयक माहिती देण्यात येते. ही माहिती 'राम प्रहर'च्या वाचकांसाठी लाभदायक ठरत असते. याच सदरात दर रविवारी आता वाचकांसाठी प्रश्नमंजुषा सुरू करण्यात आली आहे.

'अर्थसाक्षर' या शीर्षकाखाली दर रविवारी प्रश्नमंजुषेमध्ये वाचकांना तीन प्रश्न विचारण्यात येतील. या प्रत्येक प्रश्नासोबत चार पर्यायी उत्तरे दिली जातील. त्यातील योग्य उत्तर वाचकांनी निवडायचे आहे. निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या 7738106009 या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

या तिन्ही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तिन्ही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील. तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा.



**पनवेल : नवी मुंबई महापालिकेच्या वाशी येथील हॉस्पिटलमध्ये इर्टनशीप करणारे डॉ. ओलीन डोवारी यांनी कोरोना महामारीच्या काळात जीवाची पर्वा न करता आपले सेवाकार्य सुरू ठेवले होते. या कार्याची दखल घेत त्यांना कोरोना योद्धा म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी डॉ. ओलीन डोवारी यांचे अभिनंदन व कौतुक केले. या वेळी नागेश्वरराव डोवारी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजपचे ज्येष्ठ नेते शांताराम पोपेटा राहात असलेल्या भानघर येथील रहिवासी कॉलनीमध्ये श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी तेथे भेट देऊन दर्शन घेतले. आयोजकांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील आदी उपस्थित होते.**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com